पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

●वर्ष १६ ●अंक २६ ●शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com


**सुविचार**

समाजाप्रती परोपकाराची भावना,
प्रत्येक जबाबदार निर्णय आणि विचारपूर्वक
उचललेलं प्रत्येक पाऊलही
मोठा बदल घडवू शकतं.






# चंद्रकांत पाटलांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचेत!

## राज ठाकरे यांची उच्च तंत्रशिक्षण मंत्र्यांवर टीका

प्रतिनिधी | १ ऑगस्ट

**मुंबई :** सध्याच्या काळात नव्या जेन झी पिढीला अपेक्षित असणाऱ्या पद्धतीने विचार करायला पाहिजे. त्यासाठी जुन्या भ्रामक कल्पना सोडून दिल्या पाहिजेत. आमच्या काळात आई सांगायची की, 'डोक्याला रात्री तेल लावत जा, बुद्धी तल्लख होते.' पण एका माणसाने आयुष्यभर केसाला तेल चोपड चोपड चोपडलं, पण त्याला बुद्धी आली नाही. या माणसाचा प्रत्येक केस स्वतंत्र उमेदवारासारखा उभा असतो. अशा शब्दांत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना लक्ष्य केले.

चंद्रकांत पाटील यांच्यासारखे व्यक्ती आमचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आहेत. आपण काय बोलतोय, जग कुठे चाललंय, याचा विचार करायला पाहिजे. आपण महाराष्ट्राचे शिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री आहोत. पण चंद्रकांत पाटील म्हणतात की, आंदोलनात जे दगड फेकण्यात आले आहेत, त्या दगडावरच्या फुटप्रिंटस आधारशी लिंक केल्या जाणार आहेत, असे चंद्रकांत पाटील म्हणतात. मला चंद्रकांत पाटील यांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचे आहेत. कोल्हापूरकरांनी या माणसाला ज्ञान मिळावं म्हणून कोल्हापूरवरुन पुण्यात पाठवलं, जे शिक्षणाचं माहेरघर आहे, पण तिथेही यांचं काही झालं नाही. आता असे शिक्षणमंत्री म्हटल्यावर जेन झी पिढीचा पारा चढणार की नाही? ते म्हणत असतील की, अशी माणसं आमच्या नशिबी आणून ठेवलेत, अशी टीका राज ठाकरे यांनी केली.



### तुम्ही जे पेरलं तेच उगवलं!

पंतप्रधान मोदी नुकताच एक व्हिडीओ शेअर केला. त्यामध्ये ते म्हणतात की, जेन झी कडून माझ्याबाबत, माझ्या आईविषयी वापरण्यात आलेली भाषा अयोग्य आहे. मी पंतप्रधानांशी याबाबत सहमत आहे. कोणाबाबतही खालच्या थरातील भाषा वापरली जाऊ नये, १०० टक्के मान्य आहे पंतप्रधानांचं. पण मला त्यांना एवढंच सांगायचं आहे की, ही गोष्ट तुमच्या पक्षातील लोकांनाही सांगा. महात्मा गांधी, नेहरु, इंदिरा गांधी यांच्यापासून आमच्यापर्यंत तुमची ट्रोलची टीम प्रत्येक राज्यात बसवली आहे, ते कोणत्या भाषेत बोलतात. हे सगळं गेल्या १२ वर्षात सुरु झाले आहे, तुम्ही जे पेरलं तेच उगवलं आहे, तेच तुमच्या अंगावर आलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी हे त्यांच्या लोकांनाही सांगावे. दुसऱ्यांनाही आया असतात.

# फक्त रीलमध्येच माफ कराल की खटलेही मागे घ्याल?

## अभिजीत दिपकेंचा मोदींना प्रश्न | युवतीविरोधात झिरो एफआयआर दाखल कसा?

वृत्तसंस्था | १ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी उशीरा रात्री एक व्हिडीओ प्रसिद्ध करत, जंतर मंतरवर शिवीगाळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना माफ केल्याचे सांगितले. पंतप्रधान मोदींनी या व्हिडीओच्या माध्यमातून युवकांना एकत्र येऊन देशासाठी काम करुया असे आवाहन देखील केले. मोदींच्या या व्हिडीओनंतर पंतप्रधान मोदींच्या इन्स्टाग्रामवरील व्हिडीओवर कमेंट करत त्यांना प्रश्न केला आहे. अभिजीत दिपकेंनी, "तुम्ही त्यांना फक्त रीलमध्येच माफ कराल की खटलेही मागे घ्याल?," असा पंतप्रधान मोदींना प्रश्न केला आहे. दिपके यांनी पंतप्रधान मोदींच्या इन्स्टाग्राम व्हिडिओवर कमेंट केली आहे. नीट पेपरफुटी विरोधात जंतर मंतरवर झालेल्या आंदोलनावेळी एका युवतीने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आक्षेपार्ह भाषेत टिप्पणी केली होती. याप्रकरणी या युवतीविरोधात झिरो एफआयआर देखील दाखल झाला होता. सीजेपीकडून याप्रकरणी निषेध देखील नोंदविण्यात आला होता. अशाप्रकारे गुन्हा दाखल करणे योग्य नसल्याचे प्रवक्त सौरव दास यांनी म्हटले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी उशीरा रात्री एक व्हिडीओ प्रसिद्ध करत शिवीगाळ करणाऱ्या आंदोलक विद्यार्थ्यांना माफ केल्याचे म्हटले आहे. "दिशा भरकटलेली ही मुलं आहेत, त्यांना योग्य रस्ता दाखवणं आपलं काम आहे. त्यांना शिक्षा देणं, न्यायालयाच्या फेऱ्या मारायला लावणं यामुळे परिस्थिती बदलणार नाही, मला त्यांना माफ करायचंय", असे म्हणत मोदींनी आंदोलकांना माफ केल्याचे जाहीर









“जो कलावंत जनतेची कदर करतो. त्यांचीच कदर जनता करते.हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी व्हावा, इथे समता नांदावी या महाराष्ट्रभूमीचे नंदनवन व्हावे, अशी मला दररोज स्वप्ने पडत असतात. ती मंगल स्वप्ने पाहत पाहत मी लिहीत असतो. केवळ कल्पनेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते. सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्यांनी सर्व दिसते. पण हे साहित्यिकाला हात देत नाही, उलट दगा देते. माझा असा दावा आहे की, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.” ह्या होळी जरी आपण वाचला तरी आपल्याला अण्णाभाऊंच्या साहित्याची आणि त्यांच्या विचारांची उंची दिसून येईल. अण्णाभाऊ साठे म्हणजे मराठी साहित्याच्या इतिहासातील एक सुवर्ण पान आहे.दिनांक ०१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या ठिकाणी वालूबाई आणि भाऊराव साठे यांच्या पोटी इथल्या समाज व्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या मांग जातीत अण्णा भाऊंचा जन्म झाला.

# उपेक्षितांच्या जगण्याला बळ देणारा साहित्यकार : अण्णा भाऊ साठे

तुकाराम हे त्यांचे लहानपणीचे नाव. घरी अठराविश्वे दारिद्र्य.अण्णाभाऊ जन्मले त्यावेळी फकिराने बेडसगावाचा खजिना लुटून आणला होता. त्यातील काही भाग अण्णांच्या पालण पोषणासाठी फकिराने वालूबाइकडे दिला होता. लहानपणापासूनच अण्णांना जातीयतेचे विषमतेचे, दारिद्र्याचे आणि अंधश्रद्धेचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे अण्णांनी जे लिहिलं, जे आपल्या लेखणीतून साकारलं. ते कल्पनेतलं नाही तर स्वतः भोगलेलं, स्वतःजगलेल आहे तेच त्यांनी कागदावर उतरवल आहे आणि म्हणूनच एवढ्या आत्मविश्वासाने त्यांनी ‘ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे, असा ठामपणे दावा केलेला आहे.

अण्णाभाऊंचे शिक्षण केवळ दीड दिवसाचे परंतु, त्यांनी साकारलेल साहित्य आणि त्यातून दिलेला संदेश हा आजही तितकाच मार्गदर्शक आहे.अण्णा भाऊंनी औपचारिक शाळेत शिक्षण घेतले नसले तरी त्यांना इथल्या रूढी परंपरा, जातीय विषमता, समाजातील पराकोटीच्या अंधश्रद्धा आणि जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्ष यांनी त्यांना लिहिते केले आणि म्हणून त्यांचे लिखाण हे वास्तववादी, कष्टकऱ्यांचे जगणं, कष्टकऱ्यांचे दुख मांडणारे आहे. “अण्णा भाऊंचे नायक व नायिका ही प्रतिनायक किंवा न-नायक नाहीत, तर ते प्रतिकूल परिस्थितीतही स्वातंत्र्य व न्यायासाठी प्राणार्पण करायला तयार असणारे धीरोदात्त नायक आहेत. म्हणून अण्णा भाऊंचे साहित्य जगातल्या अभिजात साहित्याच्या तुलनेत किंचित उजवे ठरते. आर्थिक कुचंबणा, सामाजिक प्रतिष्ठा, उच्चवर्णीयांकडून होणारा अन्याय यातूनही माणूसपण जपणाऱ्या अण्णा भाऊंनी रेखाटलेली पात्रे सामान्य माणसाच्या जगण्याला बळ देत राहतात.”

अण्णा भाऊ म्हणतात, “माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात. जगाला जगवतात, त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांची झुंज आणि त्यांचे यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रुप करायला आवडत नाही.”अण्णा भाऊंनी आपल्या कथेत कंजारी, कैकाडी, डोंबारी, गोसावी, बेलदार, घिसाडी, नंदीवाले, वडार, फासेपारधी, डवरी भिकारी, गारुडी अशा भटक्या विमुक्तांचे जग आणि त्यांच्या भावविश्वाचे दर्शन ठळकपणे केले आहे, त्यामुळे अण्णा भाऊंना केवळ ग्रामीण कथाकारांच्या यादीत बसवता येणार नाही. मराठी कथेला अपरिचित असलेल्या भटक्या समाजघटकांचे जगणे, त्यांचा संघर्ष, त्यांचे भावविश्व यांचे चित्रण पहिल्यांदा अण्णा भाऊंनी केले आहे. अलुतेदार, बलुतेदार, वतनदार यांच्या पलीकडेही असलेल्या समाजघटकांची ठळकपणे दखल अण्णा भाऊंनी घेतलेली दिसते.

## आंबेडकरवादी अण्णा भाऊ –

अण्णा भाऊ साठे यांच्यावर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव असला तरी त्यांच्या साहित्यात आंबेडकरवादी विचारधाराही तितक्याच ताकदीने अवतरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अण्णा भाऊंना अपार प्रेम वाटत होते. त्याची अभिव्यक्ती लेखनाद्वारे झालेली दिसते. फुले, शाहू, आंबेडकरांनी जो विचार मांडला तोच विचार अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून आविष्कृत केला आहे. महापुरुषांची सामाजिक न्यायाची भूमिका अण्णा भाऊंनी प्रकर्षाने मांडली आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, मानवता इत्यादी मूल्ये आढळतात. त्यांच्या पात्रांचा वर्तनविचार हा या मूल्यांना जोपासणारा आहे. फुले, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने अण्णा भाऊंनी समर्थपणे पेलला आहे. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेली विज्ञाननिष्ठा अण्णा भाऊंनी



जोपासली आहे.

वारणेच्या खोऱ्यात या कादंबरीतील निवेदन या संदर्भात महत्त्वाचे आहे..”.... पाय तिथं परमेश्वर मग भटजीची काय जरुर आहे? आणि भटजीच्या पंचांगात पाहून जर सर्व करायचं तर माणसाला काहीच करता येणार नाही. लग्नच काय, परंतु ऊसाला पाणीसुद्धा पाजता येणार नाही. .... रोज उठून मुहूर्त पाहायचा म्हटलं तर आमचे बारा वाजतील. अहो मरायसाठी देखील पंचांग चाळावं लागेल. म्हणून म्हणतो, आता नवा कायदा सुरू करा.” यावरून अण्णा भाऊ मनुवादी विचारांना नाकारून विज्ञानाची कास धरतात असे म्हणावे लागेल. त्यांनी चिखलातील कमळ, अलगुज, वैजयंता या कादंबऱ्यांतून अंधश्रद्धेमुळे होणारे स्त्रियांचे शोषण रेखाटून वैज्ञानिक जागृती किती महत्त्वाची आहे, हे सूचित केले आहे. बाबासाहेबांनी सांगितलेल्या मानवतेचा जागर केला म्हणूनच अण्णा भाऊंच्या लेखनाला वेगळेपण प्राप्त झाले आहे. बाबासाहेबांची सामाजिक न्यायाची, शोषणमुक्तीची चळवळ तर त्यांनी अतिशय जवळून पाहिली आहे. फुले, आंबेडकरांनी सामाजिक प्रश्नांना प्रत्यक्ष वाचा फोडण्याचे काम केले. तर अण्णा भाऊंनी त्यांचा विचार साहित्याच्या माध्यमातून तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. महापुरुषांना केवळ डोक्यावर घेऊन मिरवणाऱ्यांपैकी अण्णा भाऊ नव्हते. या महापुरुषांचे विचार कथा, कादंबरी आणि शाहिरीच्या माध्यमातून जनमानसात पेरण्याचे महान कार्य अण्णा भाऊंनी केले आहे.त्यामुळे त्याचा परिणाम अण्णा भाऊंच्या लेखनावर दिसतो. सृष्टीची निर्मिती ईश्वराने केली नाही, या आंबेडकरवादी भूमिकेचे प्रतिबिंब अण्णा भाऊंच्या लेखनात पडलेले दिसते धर्माच्या नावाखाली गरिबांची पिळवणूक करण्यासाठी ईश्वराची निर्मिती केली गेली. हा आंबेडकरी विचार अण्णा भाऊंच्या मनावर ठसला होता.त्यामुळेच अण्णा भाऊंनी आपल्या वगनाट्याची सुरुवातही गणपतीऐवजी मातृभूमीला, छत्रपती शिवरायांना वंदन करून केली आहे.हा एक क्रांतीवादी बदल अण्णा भाऊंनी शाहिरी परंपरेत केला आहे.

डॉ. आंबेडकरांनी देव, धर्म, रूढी, परंपरा यांना नाकारले. अण्णा भाऊंनीही या अनिष्ट गोष्टींचे समर्थन केलेले दिसत नाही. उलट विज्ञानवादाची दिशा त्यांच्या लेखनातून सापडते. अण्णा भाऊ साठे जरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत खांद्याला खांदा लावून लढले नसले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचे वा त्यांच्या चळवळीचे प्रत्यक्ष चित्रण अण्णा भाऊ यांनी केले नसले तरी आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र त्यांनी बाबासाहेबांचे विचार प्रमाण मानून आपल्या साहित्यकलेच्या माध्यमातून त्याचा सर्वदूर प्रचार-प्रसार केला. त्या काळी मराठी साहित्यात आंबेडकरी विचार इतक्या प्राणपणाने मांडणारा साहित्यिक क्वचितच सापडेल. आपला अनुभव, प्रतिभा आणि बाबासाहेबांचा विचार यातून साहित्याचा मळा फुलवणारे ते थोर आंबेडकरवादी साहित्यसम्राट होते. शाहीर संभाजी भगत यांनी फुले-आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे ही साखळी समजावून सांगताना खूप सुंदर उदाहरण दिले आहे. “ब्राह्मणाचे कसब हा ग्रंथ महात्मा फुले यांनी कुणबी, माळी समवेत महार आणि मांग समाजाला अर्पण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपला हू वेअर द शुद्रा हा ग्रंथ महात्मा फुले यांना अर्पण केला. तर अण्णा भाऊ साठे यांनी आपली प्रसिद्ध कादंबरी फकिरा ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली.”

छत्रपती शिवरायांची महती सातासमुद्रापार पोहचविणारे अण्णा भाऊ हे या देशातील पहिलेच क्रांतीकारी शिवशाहीर. मात्र ते केवळ समाज व्यवस्थेने कनिष्ठ मानलेल्या मांग जातीत जन्माला आले म्हणून हा हिमालयाच्या उंचीचा समाज सुधारक, मानवतावादी साहित्यकार या महाराष्ट्राच्या मातीत मात्र उपेक्षितच राहिला.त्यांचे साहित्य जागातिक भाषेत भाषांतरीत झाले, जगाला त्यांची महती कळाली परंतु, या देशात ते आजही उपेक्षितच आहेत.त्यांच्या मांग समाजानेही त्यांना पाहिजे तसे स्वीकारलेले दिसत नाही.त्यांचा शिक्षणाचा,संघर्षाचा नि स्वाभिमानाचा विचार समोर घेऊन जाणे हिच त्यांना जयंतीदिनी खरी आदरांजली ठरेल.

-विनोद सिंधू मधुकर बोरकर,
मु.पो.पांगरी नवघरे,तां.मालेगाव
जि.वाशीम.
मो.९३७३३३५४५५

### अंधश्रद्धेवर कठोर प्रहार करणारे विज्ञानवादी अण्णा भाऊ –

अण्णा भाउंच्या साहित्यात कोठेही अनिष्ट चालीरीती किंवा रूढी परंपरा यांना थारा दिलेला दिसत नाही उलट कोणतेही शिक्षण नसताना ते आधुनिकता आणि विज्ञानवाद जोपासतांना दिसतात. एका अर्थाने अण्णा भाऊंच्या कथा ह्या भविष्यातील चळवळीचा वेध घेणाऱ्या आहेत, बरबाद्या कंजारीमधील बरबाद्याचं जातपंचायतीविरुद्धचं बंड असो,सापळा कथेतील हरीबा महाराचा गावबंदीविरुद्धचा लढा असो, मरीआईचा गाडामधील नाना पाटलाचे अंधश्रद्धेविरुद्ध उभे ठाकणे असो, आवडी मधील देशमुखाच्या आवडीचे तिच्या भावानेच केलेले ऑनर किलिंग असो, अनेक कथांमधून ‘बिलवरी’, ‘आवडी’, ‘गीता’, ‘चंद्रभागा’ यांसारख्या नायिका आपल्याला त्यांच्या हक्कासाठी लढताना दिसतात. सापळा कथेतील मेलेली ढोरं ओढण्यासाठी वापरली जाणारी ‘कावडणी’ हरीबा महाराकडून फोडणे हे विद्रोही भावनेचेच प्रत्येक आहे. एकूणच, अण्णा भाऊंच्या कथा ह्या परिवर्तनवादी संवेदनशीलता आणि जीवनदृष्टीचा प्रत्यय देणाऱ्या आणि अंधश्रद्धा-चमत्काराविरुद्ध बंद पुकारणाऱ्या आहेत.

डॉ. प्रकाश दुकळे म्हणतात, “अंधश्रद्धेमुळे सामान्य माणूस अधिक दबलेला आणि पिचलेला होता. वैज्ञानिक गोष्टींचा स्वीकार करणे हे पाप समजले जात होते. अशा परिस्थितीत समाजाला जागे करण्यासाठी अण्णा भाऊंनी साहित्यातून विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिवाद ही मूल्ये मांडली.” अण्णा भाऊंच्या अनेक व्यक्तिरेखा अंधश्रद्धेला, ईश्वराला नाकारतात. मरीआइचा गाडा या कथेतील नाना विज्ञानवादी आहे. मरीआई आली आणि रोगराई पसरली म्हणून हवालदिल झालेले गावकरी जेव्हा ‘चाकं बंद झाली पाहिजे’ असं म्हणतात. तेव्हा नाना म्हणतो, “आपल्या शिवारातनं आगिनगाडी रोज जातीया. एका मालगाडीला साठ डबा असतो आनि एका डब्याला चार चाकं असतात. म्हंजी समदी मिळून दोनशे चाळीस चाकं असत्यात. ती आधी गुमान बंद करा.” यातून नाना विज्ञानवादी भूमिकेचा पुरस्कार करणारा आहे असे दिसते. बरबाद्या कंजारी, दे.भ.चं भूत, भुताचा मळा, जोगीण, स्मशानातील सोनं या कथांतून अण्णा भाऊंनी ग्रामीण समाजातील अंधश्रद्धेच्या विरोधात दंड थोपटून त्यांचा नायक खंबीरपणे उभा केला आहे आणि विज्ञाननिष्ठा जोपासली आहे.जी आजच्या एकविसाव्या युगातही आपल्याला झेपणारी नाही.

# हेल्मेट न घालणाऱ्यांवर कारवाई सुरु



**अकोला** : 1 ऑगस्ट पासून अकोला शहरात हेल्मेट सक्तीचा आदेश देण्यात आला. परंतु बरेच वाहन चालक विना हेल्मेट दिसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक शाखा पोलिस चौकाचौकात तपासणी करीत आहेत. हेल्मेट सक्तीचा आदेश नागरिकांच्या सुरक्षेची संबंधित आहे. त्यामुळे त्याचे पालन करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात तर हेल्मेट शिवाय येणाऱ्यांना आजपासून प्रवेश बंदी राहणार आहे. नागरिकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. दुचाकी चालकाने हेल्मेट शिवाय वाहन चालवू नये. तसे दिसल्यास दंड वसूल करण्यात येत आहे.

# वायफळ खर्च न करता विद्यार्थांना शालेय साहित्य वितरित

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**हिवरखेड** : येथील स्थानिक रहिवासी हसंतोष शर्मा यांनी यांचा वाढदिवस जि. प. कन्या शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित करून साजरा केला.

वाढदिवस म्हटल की प्रत्येकांच्या समोर डी जे पार्टी दारू मटण असे समोर येते पण जगात दानशूर व्यक्तीची सुद्धा कमी नाही असे उदाहरण हिवरखेड येथील दानशूर स्व सुरजबाई शर्मा यांचे पुत्र संतोष शर्मा हे आहेत यांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू पेन्सिल , शॉपनर, खोडरबल, पाणी पिण्यासाठी बाटली अशा विविध वस्तूचे वितरण करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक खिरोडकार, खडसे, आम्ले मैडम, भोपळे मैडम, घायल मैडम सामाजिक कार्यकर्ते चिंतामणराव खिरोडकार, प्रशांत भोपळे उपस्थित होते.



# हातरुण गावात रस्त्यावर सांडपाणी साचल्याने विद्यार्थी, महिला व वाहनधारक त्रस्त



**हातरूण** : रस्त्यावर सांडपाणी साचल्याने विद्यार्थी, महिला व वाहनधारकांना त्रास होत आहे. ग्राम हातरुण येथे मोठ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण झाले. परंतु आतील गल्लीतील

बसस्टँड ते नासिरखानच्या घरापर्यंत मोठ्या प्रामाणात काँक्रीटीकरण करण्यात आले. मेन चौक पर्यंत बाकी आहे. ढलाईचा रस्ता असल्यामुळे रस्त्यावर पावसाच्या पाण्यामुळे मोठा खड्डा तयार झाला असून, या खड्ड्यात सतत पाणी साचत असल्याने परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, ये-जा करणारे नागरिक व महिला तसेच दुचाकी व चारचाकी वाहनधारकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र पाण्याखाली खड्ड्याची खोली दिसत नसल्याने वाहन घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळकरी विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागत असून, महिलांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनत असून, एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच ग्राम प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

“अपघात झाल्यानंतर जाग येण्यापेक्षा ग्रामप्रशासनाने तात्काळ उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा,” अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे सध्या ग्राम पंचायतीमध्ये प्रशासक शासन असल्यामुळे विविध विकासकामे व नवीन कामांनाशासनाच्या निर्देशानुसार काही मर्यादा आहेत मात्र नागरिकांच्या अड्चनींची आम्हाला पूर्ण जानीव आहे संबंधित रसत्यावर पावसामुळे मोठ्या प्रमाणात पानी साजुन चिखल होत असून हॉट यामुड़े नागरीकांना त्रास होत आहे. प्रशासनाच्या निदर्शनास बाब आणुन देण्यात येईल.

# आलेगाव येथील निर्गुणा नदी पुलाचे कठडे वर्षभरापासून गायब



## प्रशासनाच्या दुर्लक्षाचा कळस!

**आलेगाव (विशेष प्रतिनिधी):** पातूर तालुक्यातील आलेगावयेथील निर्गुणा नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे (सुरक्षा भिंती) गेल्या वर्षभरापासून पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वृत्तपत्रांमधून वारंवार बातम्या प्रसिद्ध करण्यातदिली. मात्र, वर्ष उलटूनही सार्वजनिक बांधकाम विभागाला (PWD) अद्याप जाग आलेली नाही.

### जीवघेणा प्रवास आणि धोक्याची घंटा

आलेगाव येथील निर्गुणा नदीवरील हा पूल परिसरातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. दररोज शेकडो लहान-मोठी वाहने, दुचाकीस्वार आणि विशेषतः शाळकरी विद्यार्थी या पुलावरून ये-जा करतात. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास पुलाची परिस्थिती अधिकच धोकादायक बनते.

प्रशासनाच्या या ढिम्म आणि बेजबाबदार कारभारामुळे या पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग एखाद्या मोठ्या अपघाताची किंवा जीवितहानीची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

मुसळधार पावसात पाण्याचा अंदाज न आल्यास एखादे वाहन थेट नदीपात्रात कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या पुलावरून प्रवास करणे सध्या जीवघेणे ठरत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कठडे उभारून नागरिकांच्या सुरक्षिततेची उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात अनेक गरजूंना विविध योजनांचा लाभ

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मूर्तिजापूर** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून मूर्तिजापूर शहरात ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे’ आयोजन करण्यात आले. या शिबिराला मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रलंबित समस्या आणि विविध प्रशासकीय अडचणींचे निराकरण करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या समाधान शिबिराच्या माध्यमातून मूर्तिजापूर तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत, विविध प्रकारचे शासकीय दाखले तसेच शासनाच्या विविध योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना





लाभ देण्यात आला. अनेक दिवसांपासून विविध कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेल्या नागरिकांच्या समस्या एकाच ठिकाणी सोडविण्यात आल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाला आमदार हरीश पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार आप्पा, बार्शीटाकळीचे उपविभागीय अधिकारी डॉ. मिलिंद जगदाळे, आयोजक मूर्तिजापूर तहसीलदार शिल्पाताई बोबडे, व तहसीलदार रवींद्र कापसीकर, नगराध्यक्ष हर्षल साबळे, गटनेते गजानन नाकात, उपाध्यक्ष रोहित अवलवार, आत्मा समितीचे तालुकाध्यक्ष शामाल भूषण कोकाटे, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, ठाणेदार धर्मेंद्र जोशी, ठाणेदार नावकर, कृषी अधिकारी दीपक तायडे, संदीप जळमकर इब्राहिम घाणीवाला, राहुल पाटील, राम खंडारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तहसीलदार शिल्पाताई बोबडे यांनी मान्यवरांचे शाल व रोपटे देऊन स्वागत केले. यावेळी उपविभागीय अधिकारी संदीपकुमार आप्पा यांनी प्रास्ताविकातून महसूल विभाग हा जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून, नागरिकांच्या विविध समस्या तातडीने सोडविण्यासाठी अशा समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले.

शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित असल्याने नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी एकाच छताखाली सुविधा उपलब्ध झाली. विविध दाखले, शासकीय योजनांचा लाभ, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांचे निराकरण तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत यासह अनेक प्रकरणांवर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही केली. या शिबिराला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला. शासनाच्या विविध योजना आणि सुविधांचा लाभ थेट गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही यावेळी नागरिकांनी व्यक्त केली. समाधान शिबिराच्या माध्यमातून गरजू नागरिकांना विविध योजनांचा लाभ आणि आवश्यक दाखले मिळाल्याने नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

# गट विस्तार अधिकारी पातुर हस्ते नूतन विद्यालयात वृक्षारोपण



**आलेगाव** : आलेगाव परिक्षेत्रातील नामवंत विद्यालय नूतन विद्यालय मध्ये दिनांक 31 जुलै 2026 शुक्रवारला श्री प्रदीप गुजर गटविस्तार अधिकारी पातुर पंचायत समिती तसेच श्री अनंत लव्हाळे विस्तार अधिकारी पातुर श्री प्रतीक नागापुरे ग्राम अधिकारी गोंधळवाडी सामाजिक कार्यकर्ते अमोल घायवट जांब नूतन विद्यालयाचे अध्यक्ष श्री अक्षय जी जैन, प्राचार्य नूतन विद्यालय राठोड सर पर्यवेक्षक माळी सर ,प्राचार्य ,जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट महावीर सर आदी मान्यवर उपस्थित होते.

नूतन विद्यालयाच्या प्रांगणामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नूतन वृक्षाचे रोपण करण्यात आले तसेच मागील वर्षी लावलेल्या झाडाचा वाढदिवस सुद्धा केक कापून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी उपस्थित अतिथींचे संस्थेच्या तर्फे स्वागत करण्यात आले आणि नूतन विद्यालयाचे शिपाई श्री पद्माकर जी पातोडे यांच्या सेवापुर्ती निमित्त त्यांचा सुद्धा सत्कार उपस्थित मान्यवरांनी केले. माननीय गटविस्तार अधिकारी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करण्यासोबतच वृक्ष संवर्धनाची सुद्धा सवय लावावी असे विद्यार्थ्यांना सांगितले उपस्थित मान्यवरांनी विद्यालयाच्या वृक्ष संवर्धनाच्या सवयीला पाहून विद्यालयाचे खूप खूप कौतुक केले. या कार्यक्रमाकरिता नूतन विद्यालयाचे सर्व शिक्षक कर्मचारी तसेच गुरु गणेश मिश्री जैन कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक कर्मचारी आणि जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट चे सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## एनसीएमसी स्मार्ट कार्डची मुदत वाढली

**अकोला :** एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभघेण्यासाठी 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय शासनाच्यावतीने घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५०% सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# खड्ड्यांचे साम्राज्य; अकोटकरांचा जीव धोक्यात, प्रशासन मात्र सुस्त

वि. प्रतिनिधी १ ऑगस्ट



**अकोट :** संततधार पावसामुळे अकोट शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नसल्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना वाढल्या असून अनेकांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. वाहनांचे नुकसान तर रोजचेच झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे नागरिकांच्या सेवेसाठी असलेल्या नगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावरच मोठे खड्डे पडले आहेत. दररोज शेकडो नागरिक, अधिकारी आणि पदाधिकारी ये-जा करत असताना या धोकादायक परिस्थितीकडे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. "शहरातील रस्ते दुरुस्त करण्याची जबाबदारी असलेल्या नगरपालिकेला स्वतःच्या दारातील खड्डे दिसत नाहीत का?" असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. अकोट-दर्यापूर, अकोट-हिवरखेड, अकोला रोड, अंजनगाव रोड तसेच शहरातील अंतर्गत रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून केवळ मुरूम टाकून केलेली थातुरमातुर डागडुजी पहिल्याच पावसात वाहून गेली आहे. "डागडुजीचे ठिगळ किती दिवस रस्त्यांची इज्जत झाकणार?" असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.अकोट-दर्यापूर मार्गावर शाळा, महाविद्यालये आणि श्रद्धासागर धार्मिक स्थळ असल्याने हजारो नागरिकांची वर्दळ असते. तर अकोट-हिवरखेड मार्गावर राधास्वामी सत्संग व्यासपीठ व सूतगिरणी परिसरात रस्ता खड्ड्यांनी व्यापला आहे. पावसामुळे मार्गाला गटारीचे स्वरूप आले असून वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.रात्रीच्या वेळी खड्डे दिसत नसल्याने गंभीर अपघाताची भीती वाढली आहे. वाढता वाहन दुरुस्ती खर्च, अपघातांचा धोका आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपालिकेने तातडीने दखल घेऊन धोकादायक खड्डे बुजवावेत, तसेच तात्पुरत्या डागडुजीऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करून अकोट शहर खड्डेमुक्त करावे, अशी जोरदार मागणी नागरिक, विद्यार्थी आणि वाहनधारकांकडून होत आहे.

## भाजीबाजारात अस्वच्छतेचा कळस



**अकोला :** शहरवासीयांचा आठवडी बाजाराचा दिवस असलेल्या रविवारी अनेक नोकरमाने व इतर नागरिक जनता भाजी बाजारात भाजीपाला घेण्यासाठी येतात. मात्र त्यांना अस्वच्छतेचा सामना करावा लागतो. गाडी पार्किंग जागेपासूनच दुर्गंधी व कचऱ्याचे ढीग दिसून येतात. तसेच आतमध्ये गेल्यानंतर चिखलच चिखल असून, त्यातच ते भाजीपाला विकत असल्याने आरोग्याचा प्रश्नही निर्माण होत आहे. यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांकडून करण्यात येत आहे. पावसाळ्यात दरवर्षी अशी स्थिती निर्माण होते परंतु उपाय योजना होत नाही.



## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सोनू चौक मार्ग खड्डेमय

### पावसाने नागरिकांची कसरत वाढली



प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अकोट :** अकोट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सोनू चौक हा शहरातील प्रमुख वर्दळीचा रस्ता सध्या मोठमोठ्या खड्ड्यांनी विद्रूप झाला आहे. सततच्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने रस्ता जलमय झाला असून वाहनचालक, पादचारी आणि व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

बाजारपेठेतील या मुख्य मार्गाची दुरवस्था पाहता नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, संबंधित प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## मूर्तिजापुरातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या 'अपडाऊन'वर कारवाईची मागणी

**मूर्तिजापूर :** अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर शहरातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात दररोज अपडाऊन करीत असल्याने त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या शासकीय कामांवर होत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. अनेक अधिकारी व कर्मचारी ४० ते ५० किलोमीटर अंतरावरून दुचाकीने दररोज ये-जा करीत असल्याने त्यांचा वेळ प्रवासात जातो. परिणामी नागरिकांना आपल्या कामासाठी कार्यालयांमध्ये तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र आहे.

मूर्तिजापूर तालुक्यातील ग्रामीण भागातून विविध शासकीय कामांसाठी नागरिक मोठ्या अपेक्षेने शहरातील शासकीय कार्यालयांमध्ये येतात. मात्र, संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपलब्ध नसल्यास त्यांना पुन्हा-पुन्हा कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असून, शासकीय सेवांचा अपेक्षित लाभ वेळेत मिळत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष घालून मूर्तिजापूर शहरातील विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अपडाऊनच्या प्रश्नावर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी अर्थात मुख्यालयी राहणे आवश्यक असून, त्याबाबत प्रशासनाने स्पष्ट निर्देश देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तसेच अकोला जिल्हाधिकारी मीना यांनी मूर्तिजापूर तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वस्तुस्थिती तपासून, मुख्यालयी न राहता दररोज अपडाऊन करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना नोटीस बजावावी आणि शासनाच्या नियमांनुसार आवश्यक ती कारवाई करावी**, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

शासकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी उपलब्ध राहिल्यास नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागतील आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन नागरिकांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा मूर्तिजापूरकर नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## हिवरखेड बसस्थानकावर प्रवास अकोट बसच्या प्रतिक्षेत, प्रवाशांमध्ये संभ्रम

हिवरखेड : येथील एस टी बसस्थाकावर भर पावसात प्रवाशी वर्गांची गर्दी यामध्ये शाळकरी विद्यार्थी, व्यापारी, व इतर शासकीय कामकाजा करिता प्रवाशांची गर्दी बसस्थानकावर सकाळीच होते मात्र प्रवाशांना अकोट जाण्या करिता महामंडळच्या एस टी बस ची प्रतीक्षा करावी लागत आहे. ही प्रतीक्षा या अगोदर नव्हती गेल्या या आठवड्या पासून पप्रतीक्षेत वाढ झाली आहे, याचे मोठे कारण समोर आले आहे.

तेल्हारा आगार व्यवस्थापन यांनी हिवरखेड अकोट रस्ता खराब असल्यामुळे आम्ही प्रवाशांच्या जीवाशी खेळू शकत नाही,या मार्गावर आम्ही बस टाकत नाही असे मनोगत यांनी प्रसिद्ध पत्रकारांशी व्यक्त केले परंतु याबाबतची बऱ्याच प्रवाशांना माहिती नसल्याने संभ्रम निर्माण होत आहे.

अकोट हिवरखेड मार्गावर जागोजागी खड्डे पडले असून रस्त्याचे काम करणारे सबंधित ठेकेदार यांनी काम करीत असताना सूचना फलक सुद्धा लावले नाही त्यामुळे या रोडवर आणखी प्रवाशांची भीती वाढली आहे या मार्गावरील सबंधित ठेकेदारांनि खड्डे बुजवावे व महामंडळने प्रवाशांची दिशाभूल करू नये अशी मागणी प्रवाशी करीत आहेत

## मराठा सेवा संघाच्या अकोला महानगराध्यक्षपदी शिवश्री डॉ.संदीप चव्हाण यांची सर्वानुमते निवड

प्रतिनिधी ३१जुलै

**अकोला :** मराठा सेवा संघ अकोला जिल्हा कार्यकारिणीची सभा जिल्हाध्यक्ष डॉ.रणजीत कोरडे यांच्या अध्यक्षतेखाली जिजाऊ सांस्कृतिक भवन, मराठा सेवा संघ कार्यालय येथे झाली. सभेची सुरुवात सामूहिक जिजाऊ वंदनेने करण्यात आली. वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ.संदीप चव्हाण यांची मराठा सेवा संघ, अकोला महानगराध्यक्ष



पदावर सर्वानुमते निवड करण्यात आली. डॉ. संदीप चव्हाण यांनी मराठा सेवा संघाच्या प्रगतिशील विचारांचा प्रचार व प्रसार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. सभेला ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. पुरुषोत्तम तायडे, जिजाऊ सांस्कृतिक भवन समिती प्रमुख बाबासाहेब गावंडे, देवराव पाटील हागे, दिवाकरराव पाटील, केंद्रीय सदस्य प्रा. प्रदीपराव चोरे, श्रीकांत बिहाडे, कार्याध्यक्ष पंकज जायले, उपाध्यक्ष डॉ. सीमाताई तायडे, डॉ. विजयराजे टाले, आनंद पाटील सुकळीकर, सचिव संदीप निर्मळ, प्रवीण चोपडे, जिल्हाध्यक्ष रेणूताई गावंडे, मीनाताई लांडे, कार्यालय सचिव दिलीप देशमुख, विनोद साबळे उपस्थित होते.

## महावितरणचा तो ग्राहक सेवा नंबर, कर्मचारी उचलीत नाही

प्रतिनिधी ३१जुलै

### तब्बल तीस तास लाईट नव्हती फोन उचायलायल पण कोणी नाही, यांच्यासह अभियंत्याचा पण नंबर बंद राहतो

**हिवरखेड :** येथील महावितरण कंपनीचा पुन्हा बेजबाबदार पना समोर आला आहे. संध्या पावसाचे दिवस सुरू असून वारंउदान पाणी पावसामुळे कुठेही तारा किंवा लाईट येणे जाणे सुरू राहते त्यामुळे ग्राहकांना आपल्या समस्या महावितरणकडे मांडाव्या लागतात, काही नागरिक आवश्यक वेळी महावितरण कंपनीच्या कार्यालयात पोहचू शकत नाहीत, त्यामुळे भ्रमध्वनी वरून संपर्क साधतात, परंतु महावितरण कंपनीचे काही बेजबाबदार कर्मचारी ज्यांना ग्राहकांचा फोन उचलायचा कंटाळा येतो , मुद्दामून फोन व्यस्त कॉलिंग मध्ये लावून देतात जेणेकरून फोनलावणाऱ्याला बिझी कॉल दिसेल, असा हा बेजबाबदार पना काही कर्मचारी करतात त्यामुळे ग्राहकांन मध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे, तसेच कुठल्याही शासकीय कार्यालयात एक अनुभवी कर्मचारी व एक नवयुक्त कर्मचारी असतो, हिवरखेड महावितरण कंपनीत मात्र सर्व तरुण कर्मचारी असल्याने कुठेतरी सिनियर ज्युनियर मध्ये अनुभवाचा फरक जाणवतो, याबाबीसह या कार्यालयांचे अभियंता यांचा सुद्धा फोन नंबर बर्याचदा बंद राहतो, यामुळे नागरिकांन मध्ये भ्रम निर्माण होतो, २७ जुलैच्या रात्रीला १३२ केव्ही वरून तब्बल तीन तास लाईट बंद होती, ज्यामुळे नागरिकांना नाहकच त्रास सहन करावा लागला, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना शिस्तीचे धळे शिकवण्याच्याची गरज निर्माण झाली असून ग्राहकांचे समाधान झालेच पाहिजे अशी मागणी ,सुज्ञ, नागरिक करीत आहेत,



# मूर्तिजापुरात बालमजुरीचा विळखा

## हॉटेल, ढाबे आणि विविध आस्थापनांमध्ये बालकामगारांकडून काम

अनवर खान ३१जुलै

**मूर्तिजापूर :** शहरासह तालुक्यात विविध हॉटेल, ढाबे, चहाच्या टपऱ्या, वाहन दुरुस्तीची दुकाने, गॅरेज तसेच अन्य आस्थापनांमध्ये अल्पवयीन मुले काम करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शिक्षण घेण्याच्या आणि खेळण्याच्या वयात या बालकांच्या हातात पुस्तके असण्याऐवजी कामाची साधने दिसत असल्याने बालमजुरीचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

अल्पवयीन मुलांकडून काम करून घेणे ही केवळ कायद्याची बाब नसून सामाजिकदृष्ट्याही गंभीर समस्या आहे. अनेक मुले आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने शिक्षण अर्धवट सोडून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करण्यास भाग पडत असल्याचे दिसते. काही मुलांना



आई-वडिलांच्या उत्पन्नाला हातभार लावण्यासाठी तर काहींना कुटुंबातील अन्य अडचणींमुळे लहान वयातच कामाच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे बालमजुरीमागील नेमकी कारणे शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.

संपूर्ण अकोला जिल्ह्यातही विविध ठिकाणी बालकामगार काम करत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येतात. मात्र, केवळ बालकामगारांची सुटका करून किंवा संबंधित आस्थापनांवर कारवाई करून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. बालकांना काम करण्यास भाग पाडणाऱ्या त्यांच्या कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती काय आहे, त्यांचे पालक बेरोजगार आहेत का, कुटुंबावर कर्जाचा बोजा आहे का, शिक्षणाचा खर्च परवडत नाही का, याचा शासनाने सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

बालमजुरी रोखण्यासाठी सर्वंकष सर्वेक्षणाची गरज

मूर्तिजापूर शहर व तालुक्यात प्रशासनाने विशेष मोहीम राबवून बालकामगारांचे सर्वेक्षण करावे, अशी मागणी होत आहे. हॉटेल, ढाबे, दुकाने, गॅरेज, बांधकाम क्षेत्र आणि इतर ठिकाणी काम करणाऱ्या अल्पवयीन मुलांची माहिती संकलित करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच अशा बालकांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती तपासून शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळवून देण्याची गरज आहे.

शिक्षणापासून एकही बालक वंचित राहू नये बालकांना शिक्षणाचा अधिकार मिळणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही मुलाला शिक्षण सोडून मजुरी करण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासन, प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा आणि सामाजिक संस्थांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज आहे. गरीब आणि गरजू कुटुंबांना आर्थिक मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शिष्यवृत्ती तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास अनेक बालकांना पुन्हा शाळेत आणणे शक्य होऊ शकते. बालमजुरीचे निर्मूलन करण्यासाठी केवळ कारवाई न करता 'बालक शिक्षणात, कुटुंब शासनाच्या मदतीत' या दृष्टिकोनातून प्रभावी धोरण राबविणे आवश्यक आहे. प्रशासनाने मूर्तिजापूरसह संपूर्ण अकोला जिल्ह्यात बालमजुरीचे वास्तव समोर आणण्यासाठी व्यापक सर्वेक्षण करून बालकामगारांच्या पुनर्वसनासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त हनुमान व्यायामशाळेत गुरुवर्यांना अभिवादन



**मूर्तिजापूर :** शहरातील हनुमान व्यायामशाळेत गुरुपौर्णिमेनिमित्त भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी काळा मारुती तसेच व्यायामशाळेचे गुरुवर्य त्र्यंबकराव वानखडे (लाला वस्ताद) यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी हनुमान व्यायामशाळेचे अध्यक्ष विनायक गुल्हाने म्हणाले, "भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आई-वडील आपल्याला जन्म देतात; मात्र गुरु आपल्याला जीवन जगण्याची दिशा देतात. आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना ओळखून त्यांना योग्य आकार देण्याचे काम गुरु करीत असतात. हनुमान व्यायामशाळेच्या माध्यमातून तरुण पिढीला व्यायामाची आवड निर्माण करण्यासोबतच सामाजिक बांधिलकी आणि संस्कारांची जपणूक करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने उपस्थित सदस्यांनी गुरुवर्य त्र्यंबकराव वानखडे (लाला वस्ताद) यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या योगदानाला अभिवादन केले. कार्यक्रमाला किशोर उघडे, नरेंद्र वानखडे, जय ग्याने, धीरज पिंपळे, शंकर गोंडे, सौरभ देशमुख, विशाल गुल्हाने, सचिन गुल्हाने, सविनय गुल्हाने, अमन साखरीकर, शुभम लिलोरे, आशिष भारंबे, पंकज जीरापुरे यांच्यासह व्यायामशाळेचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.

## निधन वार्ता

### महादेव नामदेव भटकर



**अडगाव बु. :** शिवाजी नगर येथील संत रविदास महाराज नगर येथील रहिवासी महादेव नामदेव भटकर यांचे दि. ३०जुलै वयाच्या ५६व्या वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले आहे .त्यांच्या मागे पत्नी,मुले दोन,सुना,नातवंड असा आप्तपरिवार आहे.

### गोविंदा नाठे



**हिवरखेड :** बारगनपूरा येथील रहिवासी गोविंदा मोतीराम नाठे यांचे 31/07/2026 ला निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

### रमेश गिन्हे



**हिवरखेड :** येथील सेवानिवृत्त शिक्षक रमेश ज्ञानदेवराव गिन्हे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. आज सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## राष्ट्रीय महामार्गावर किन्ही येथे खड्ड्यामुळे ट्रक उलटला

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**राळेगाव** : राष्ट्रीय महामार्ग ४४वर खड्डा चुकविताना ट्रक उलटून होऊन दोन जण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी (३१ जुलै) सकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. युपी ८७ टी २४१४ या क्रमांकाच्या ट्रकला हा अपघात झाला. हैदराबादवरून नागपूर येथे टोमॅटो घेऊन हा ट्रक येत होता. राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. खड्डा चुकवीत असताना वडकी पोलिस ठाण्याच्या हद्दीत किन्ही गावाजवळील पेट्रोल पंपजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने या ट्रकला अपघात झाला. या घटनेत ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. टोमॅटोचीही नासधूस झाली. टोमॅटोचा ट्रक उलटल्याची बातमी पंचक्रोशीत वाऱ्यासारखी पसरली. यानंतर परिसरातील लोकांनी टोमॅटो आणण्यासाठी धाव घेतली व काही वेळातच ट्रकमधील टोमॅटो फस्त केले.

# दुर्घटनेनंतर प्रशासन 'हाय अलर्ट'; पूरप्रवण भागांसाठी स्वतंत्र ॲक्शन प्लॅनचे आदेश

### पालकमंत्री संजय राठोड यांची तातडीची आढावा बैठक

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**यवतमाळ** : दारव्हा तालुक्यातील दहेली येथे पुराच्या पाण्यात कार वाहून जाऊन तिघांचा मृत्यू झालेल्या हृदयद्रावक दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेऊन संपूर्ण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा 'हाय अलर्ट'वर ठेवण्याचे निर्देश दिले. यासोबतच जिल्ह्यातील सर्व पूरप्रवण भागांसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले.

पालकमंत्री राठोड यांनी दहेली दुर्घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश दिले. संबंधित विभाग किंवा ठेकेदाराचा निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का, याचीही तपासणी करण्यास सांगितले. आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी तयार करणे, धोकादायक पूल, रस्ते आणि नाल्यांचे सर्वेक्षण करणे, २४ तास आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत ठेवणे, हवामान विभागाचे इशारे तातडीने गावागावात पोहोचविणे आणि बचाव साहित्याचा कायमस्वरूपी साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

> **दोषींवर कठोर कारवाईसह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या सूचना**

नदी-नाल्यांना पूर आल्यास संबंधित पूल आणि रस्त्यांवरील वाहतूक तात्काळ बंद करावी, धोकादायक ठिकाणी नागरिकांना जाण्यापासून रोखावे, प्रत्येक गावात स्वयंसेवक बचाव पथके तयार करावीत आणि वृद्ध, दिव्यांग तसेच लहान मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय प्रत्येक तालुक्यात स्वयंसेवी रेस्क्यू टीम स्थापन करणे, पोहणाऱ्या नागरिकांची तालुकानिहाय यादी तयार करून त्यांना प्रशिक्षण देणे, एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाशी सातत्याने समन्वय राखणे, पूरग्रस्त मार्गांवरील बससेवा तातडीने बंद करणे, तसेच पूरप्रवण पुलांवर पाणीपातळी मोजणारे सेन्सर, स्वयंचलित सायरन आणि सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याचेही निर्देश देण्यात आले. दरवर्षी मान्सूनपूर्व मॉक ड्रिल घेणे, शाळा-महाविद्यालये आणि ग्रामसभांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे, तसेच प्रत्येक तालुक्यात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन साहित्य केंद्र उभारण्यावरही भर देण्यात आला. या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी अनिल खडांगळे, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सतीश मुन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**दुर्घटनाग्रस्तांची रुग्णालयात जाऊन विचारपूस**

■ दहेली गावाजवळील अडाण नदीवरील पुलावरून मध्यरात्रीच्या सुमारास कार पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने माधवी खंडारे आणि त्यांच्या दोन मुली प्राची व साची यांचा मृत्यू झाला. तर अविनाश खंडारे यांना बचाव पथकाने सुखरूप बाहेर काढले. या घटनेनंतर पालकमंत्री संजय राठोड यांनी रुग्णालयात जाऊन अविनाश खंडारे यांची भेट घेत सांत्वन केले. तसेच मदतकार्य आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

## संततधार पावसाने बळीराजा सुखावला; खरीप पिकांना नवसंजीवनी



प्रतिनिधी १ ऑगस्ट

**उमरखेड** : तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसाने खरीप हंगामातील पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने सोयाबीन, कापूस, तूर, हळद आणि ऊस पिकांच्या वाढीस चालना मिळण्याची आशा व्यक्त होत आहे. यासोबतच भूजल पातळी वाढण्याचे संकेतही मिळत असल्याने शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचीही चिंता काहीअंशी कमी झाली आहे.

यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीला पावसाने अनियमित हजेरी लावल्याने शेतकरी चिंतेत होता. पेरणीनंतर आवश्यक पाऊस न झाल्यामुळे खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले होते. मात्र, सलग दोन दिवस झालेल्या दमदार पावसामुळे ही चिंता दूर झाली आहे. सध्या शेतांमधील सोयाबीन आणि कापूस पिकांनी नवचैतन्य धारण केले असून, हळद व ऊस यांसारख्या दीर्घकालीन पिकांसाठीही हा पाऊस लाभदायक ठरत आहे. जमिनीतील ओलावा वाढल्याने पिकांची वाढ अधिक जोमाने होईल, असा विश्वास कृषी क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, या पावसामुळे दुबार पेरणीचे संकट टळल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. मात्र, तालुक्यासाठी महत्त्वाचे असलेले ईसापूर धरण अद्याप अपेक्षित पातळीपर्यंत भरलेले नसल्याने शेतकऱ्यांची चिंता पूर्णपणे दूर झालेली नाही. आगामी काही दिवसांतही समाधानकारक पाऊस झाल्यास धरणातील पाणीसाठ्यात वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून बळीराजा आता आशेने आकाशाकडे नजर लावून आहे.

# राळेगावात ५० वाहनांवर दंडात्मक कारवाई

### वर्धा टी-पॉइंट व बसस्थानक परिसरात विशेष तपासणी मोहीम

प्रतिनिधी १ ऑगस्ट




**राळेगाव** : राळेगाव शहरातील वाढत्या वाहनसंख्येच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वाहतूक शाखेने शुक्रवारी विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सुमारे ५० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहतूक शाखा पांढरकवडा उपविभागाचे पोलीस निरीक्षक प्रकाश तायडे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा टी-पॉइंट आणि बसस्थानक परिसरात ही मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनचालकांकडे वाहनाची आवश्यक कागदपत्रे, वैध वाहनचालक परवाना तसेच इतर नियमांचे पालन होत आहे का, याची कसून पडताळणी करण्यात आली.

राळेगाव शहराचा झपाट्याने विस्तार होत असून वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र अनेक वाहनचालकांकडे वाहनांची आवश्यक कागदपत्रे किंवा वैध वाहनचालक परवाना नसल्याचे आढळून येत आहे. यामुळे वाहतुकीची शिस्त बिघडण्याबरोबरच अपघातांचा धोका वाढत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

राळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वतंत्र वाहतूक कर्मचाऱ्यांची नियुक्ती नसल्याने वाहतूक व्यवस्थापनावर ताण येत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शहरात वारंवार वाहतूक कोंडी होत असून नागरिकांकडून कायमस्वरूपी वाहतूक शाखेची मागणी होत आहे.

दरम्यान, वाहनचालकांनी वाहनाची सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर अनिवार्य करावा आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेने केले आहे. नियमभंग करणाऱ्यांविरोधातील विशेष कारवाई यापुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# चहाच्या टपऱ्या फोडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; तिघांना अटक

### उमरखेड डीबी पथकाकडून चार गुन्ह्यांची उकल

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**उमरखेड** : उमरखेड शहर व परिसरात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या घरफोडी आणि चोरीच्या घटनांचा अखेर पोलिसांनी छडा लावला आहे. रूपाळा परिसरातील तीन चहाच्या टपऱ्या व बंद दुकाने फोडून चोरी करणाऱ्या तसेच बोरबन येथील एका घरात चोरीचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या (डीबी) पथकाने अटक केली. आरोपींकडून चोरीतील शंभर टक्के मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे चार गुन्ह्यांची उकल झाली आहे.

उमरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने होत असलेल्या चोरी आणि घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. या गुन्ह्यांचा तपास गतीने करून आरोपींना अटक करण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिल्यानंतर पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली.

तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला. त्यानुसार ३० जुलै रोजी गावंडे महाविद्यालयासमोर ढाणकी रोडवर सापळा रचून तिघांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी मे महिन्यापासून रूपाळा परिसरातील तीन चहाच्या टपऱ्या आणि बंद दुकाने फोडून गॅस शेगडी, गॅस भट्टी, गॅस सिलेंडर, सोनी कंपनीचे होम थिएटर तसेच रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली. बोरबन येथील एका घरात चोरीचा प्रयत्न केल्याचीही त्यांनी कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून चोरीतील साहित्य, गुन्ह्यात वापरलेली साधने आणि ७,४०० रुपयांची रोख रक्कम असा शंभर टक्के मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी सय्यद समीर सय्यद करीम (२२), शेख रेहमान शेख रहीम (२१) आणि सुशांत किशोर चाफेकर (२०, तिघेही रा. नागापूर-रूपाळा, ता. उमरखेड) यांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी प्रमुख शरद लोहकरे, सहाय्यक फौजदार विजय पतंगे तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## पूराच्या प्रवाहाशी झुंज; नगरसेवकांनी वाचविले सहा जीव

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**आर्णी** : मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे आर्णी शहरातील राजनशाह बाबा दर्ग्याजवळील प्रकाशनगर परिसरातील नाल्याला अचानक पूर आल्याने सहा नागरिक जीवघेण्या परिस्थितीत अडकले. अशा वेळी नगरसेवक सैय्यद रियाज सैय्यद वहाब यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून बचावकार्य करत सहा जणांना सुरक्षित बाहेर काढले.

रात्री सुमारे तीनच्या सुमारास पूरस्थिती गंभीर होत असल्याची माहिती मिळताच रियाज वहाब यांनी घटनास्थळी धाव घेतली. वेगाने वाहणाऱ्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांनी स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. या मोहिमेत एका दिव्यांग बालकासह चार महिला आणि एका ज्येष्ठ नागरिकाची सुरक्षित सुटका करण्यात आली. अचानक आलेल्या पुरामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, वेळेवर केलेल्या या धाडसी बचावकार्यामुळे मोठी जीवितहानी टळल्याचे नागरिकांनी सांगितले. संकटाच्या क्षणी केवळ सूचना देण्यापेक्षा प्रत्यक्ष घटनास्थळी उतरून नागरिकांचे प्राण वाचविण्याचे काम नगरसेवक रियाज वहाब यांनी केल्याने त्यांच्या धाडसाचे आणि सेवाभावी वृत्तीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# बांधकाम कामगारांच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना सुरु करा

### काँग्रेसचे निवेदन; उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत कामगार मंत्र्यांना साकडे

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**दारव्हा** : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना बंद करण्याच्या निर्णयाविरोधात दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीने आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होणार असल्याचा आरोप करत काँग्रेसच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी, दारव्हा यांच्यामार्फत राज्याचे कामगार मंत्री आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सचिवांना निवेदन सादर केले.

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतची शिष्यवृत्ती योजना तातडीने पूर्ववत सुरू करावी, पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती पुन्हा लागू करावी तसेच इयत्ता नववी ते अकरावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती लाभ बंद करण्याचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी या योजना अत्यंत महत्त्वाच्या असून त्या बंद केल्यास अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, दिग्रस विधानसभा काँग्रेस प्रभारी प्रकाशराव नवरंगे, दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन बिबेकर, युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल राऊत, ॲड. मनोज कावळे, सेवादल काँग्रेसचे अध्यक्ष रामधन जाधव, महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षा वर्षाताई इलमे, नगरसेवक मनोहरराव नवरंगे, सरफराज खान, अजीम शहा, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह काँग्रेस, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवादल, एनएसयूआय आणि विविध आघाड्या व विभागांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिष्यवृत्ती योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी नगरसेवक आक्रमक

### तातडीच्या पंचनाम्याची मागणी




प्रतिनिधी १ ऑगस्ट

**आर्णी** : आर्णी शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त झालेल्या नागरिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नगर परिषदेचे नगरसेवक तथा गटनेते अमोल सुधाकर मांगुळकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पूराचे पाणी शिरले असून प्रभाग क्रमांक १० मधील उदयनगर, भाजी मंडई परिसर तसेच नदीकाठालगतच्या वस्त्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. घरांमध्ये पाणी शिरल्याने घरगुती साहित्य, अन्नधान्य, फर्निचर, विद्युत उपकरणे तसेच व्यापारी प्रतिष्ठानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत झाले असून त्यांच्यासमोर गंभीर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागामार्फत सर्व पूरग्रस्त भागांचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, पात्र नागरिकांना शासनाच्या विद्यमान नियमांनुसार नुकसानभरपाई व आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी, तसेच ज्या कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यांना विशेष आर्थिक सहाय्य व पुनर्वसनाचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय पूरग्रस्त भागात स्वच्छता, निर्जंतुकीकरण, आरोग्य शिबिरे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर अत्यावश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. भविष्यात अशा प्रकारची पूरस्थिती टाळण्यासाठी नदीकाठच्या परिसरात कायमस्वरूपी पूरप्रतिबंधक उपाययोजना, नाल्यांचे सक्षमीकरण आणि जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचेही मांगुळकर यांनी नमूद केले आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत प्रशासनाने बाधित भागाची तातडीने पाहणी करून मदत व पुनर्वसनाची कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि मुख्याधिकारी, नगर परिषद आर्णी यांनाही देण्यात आल्या आहेत.

# पावसाने उघडे पाडले दारव्ह्याचे विकास मॉडेल

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**यवतमाळ** : दारव्हा शहरात ३० जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील पाणी निचरा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले. प्रमुख रस्ते, चौक आणि अनेक वस्त्यांमध्ये पाणी साचल्याने नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. विकासकामांवर कोट्यवधी रुपये खर्च होत असतानाही दरवर्षी शहराला जलमय परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

बसस्थानक परिसर, गोळीबार चौक, यवतमाळ रोड, आर्णी रोड यांसारख्या मुख्य मार्गांवर पाणी साचल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. नातुवाडीसह अनेक भागांतील घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य भिजले, तर काही दुकानांमध्येही पाणी घुसल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले.

शहरात सुरू असलेले सुमारे चार कोटी रुपयांचे नाला बांधकाम अद्याप पूर्ण झाले नसल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सफाई, पाणी निचऱ्याची व्यवस्था आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रभावी नियोजन करण्यात नगर परिषद अपयशी ठरल्याची टीका होत आहे.

प्रशासकांच्या कार्यकाळातही ही समस्या कायम राहिली आणि लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतरही त्यात सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. शहर व तालुक्यात सत्ताधारी पक्षाचे प्रतिनिधित्व असूनही मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

विकासाच्या नावाखाली केवळ घोषणाबाजी होत असून प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यातून वाट काढावी लागत असल्याची टीका होत आहे. या प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून शहरासाठी कायमस्वरूपी पाणी निचऱ्याची व्यवस्था उभारण्याची मागणी बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी केली आहे. दरम्यान, प्रत्येक पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या या समस्येवर तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी दीर्घकालीन नियोजन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी दारव्हेकरांकडून होत आहे. नागरिकांच्या मते, विकासकामांचा दर्जा आणि पाणी निचरा व्यवस्थेचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण करण्याचीही आवश्यकता आहे.

## अवैध वृक्षतोडीतील आरोपींचा शोध सुरु

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**महागाव** : घानमुख बीटातील कक्ष क्रमांक ४३७ मध्ये झालेल्या अवैध वृक्षतोड प्रकरणी वनविभागाने आरोपीचा शोध घेणे सुरू केले आहे. ४ जुलै रोजी प्रकरण उघडकीस आल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यानंतर वनरक्षकांना प्रथम गुन्हा अहवाल नोंदविण्याचे निर्देश दिल्याची माहिती वनपरिक्षेत्राधिकारी राज सिंह ओवे यांनी दिली. पंचनामा, जप्तीनामा, सुपूर्दनामा तयार करून तोडलेल्या वृक्षांचा व घटनास्थळी आढळलेल्या पुराव्यांचा ताबा घेण्यात आला. संकलित पुराव्यांच्या आधारे सखोल चौकशी सुरू आहे.

# बंदूकीचा धाक दाखवून दर्यापूरच्या माहोरे ज्वेलर्स मध्ये दरोडा

## अर्धा किलो सोने व तेरा किलो चांदी लंपास

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**दर्यापूर :** शहरातील शिक्षक कॉलनी येथील माहोरे ज्वेलर्स मध्ये बंदूक व चाकू दाखवत दरोडा टाकून अर्धा किलो सोने व तेरा किलो चांदी अवघ्या पाच मिनिटात चार दरोडे खोरांनी लंपास केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी 8 वाजता दरम्यान घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील नगरपरिषद जवळील शिक्षक कॉलनी येथे गजानन माहोरे यांचे घर असून घराच्या समोरच्या बाजूला ज्वेलर्स चे दुकान आहे. शुक्रवारी सायंकाळी दुकानात माहोरे यांचा मुलगा गोविंद माहोरे एकटाच असल्याचे पाहून चार दरोडेखोर दुकानात शिरले त्यांनी तोंडाला बांधले असल्याने मुलाने आरडाओरडत करण्याचा प्रयत्न करताच त्यातील एका चोरट्यानी बंदूक व दुसऱ्यांने धारदार चाकू मुलाला दाखवला त्याचा हात पकडून ठेवला व बाकीच्या तिघांनी अवघ्या पाच मिनिटातच दुकानातील सर्व चांदीचे दागिने सोन्याचे दागिने घेऊन चारचाकी वाहणाने पळून गेले असल्याचे सिसिटीव्ही मध्ये कैद झाले. यावेळी दुकानदाराच्या मुलाचा मोबाईल फोन सुद्धा दरोडे खोरांनी नेल्याचे यावेळी मुलाने सांगितले दुकाना समोर वस्ती असल्याने काही महिलांनी त्या दरोडेखोरांना पाळताना पाहिल्याचे सांगितले. दरोडा पडल्याची घटना दर्यापूर शहरात वाऱ्यासारखी पसरताच शिक्षक कॉलनीतील नागरिक तसेच दर्यापूर शहरातील सराफा दुकानदारांनी घटनास्थळी गर्दी केली होती. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला होता. यापूर्वीसुद्धा चोरीच्या अनेक घटना सराफा दुकानांमध्ये यापूर्वी दर्यापूर शहरांमध्ये घडल्या असून आता या घटनेमुळे दर्यापूर शहरातील सराफा व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरोडाची घटना शहरांमध्ये अतिशय गंभीर मानल्या जात असून दर्यापूर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला आहे.




माहोरे ज्वेलर्स येथे दरोडा टाकून दरोडेखोर पळून जात असताना सराफा दुकानदाराच्या मुलाने आरडाओरड करत दुचाकीने त्या चोरट्यांचा पाठलाग केला परंतु ते दरोडेखोर पळून जाण्यास यशस्वी झाले.

दर्यापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

# अकोली रेल्वे अंडरपासमधील पाणी साचल्याप्रकरणी आ. प्रविण पोटे पाटील आक्रमक

## रेल्वे अधिकारी यांची बैठक घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश

प्रतिनिधी १ ऑगस्ट



**अमरावती:** मुसळधार पावसानंतर साईनगर-अकोली रेल्वे अंडरपासमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर आमदार प्रविण पोटे पाटील यांनी शुक्रवारी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर अमरावती महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

यावेळी आ. प्रविण पोटे पाटील यांनी अकोली रेल्वे अंडरपासचे काम निकृष्ट व अपूर्ण असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. छताचे काम पूर्ण न करताच अंडरपास वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले आणि नागरिकांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागली. हा प्रकार अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेत झालेल्या बैठकीत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला. यावेळी अंडरपासचे उर्वरित काम तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे, तसेच भविष्यात पाणी साचणार नाही यासाठी कायमस्वरूपी तांत्रिक उपाययोजना करण्याचे कडक निर्देश देण्यात आले.

"अमरावतीकरांची गैरसोय कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांची सुरक्षितता आणि सुविधा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे," असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी बैठकीनंतर सांगितले.

या पाहणी व बैठकीस मनपा आयुक्त मंगेश गोंदावले, महापौर श्रीचंद तेजवानी, रेल्वे विभागाचे अधिकारी, जयंत डेहनकर, शिवरायजी कुळकर्णी, चेतन गावंडे, किरण पातूरकर, चेतन पवार, संबंधित विभागांचे अधिकारी, प्रशासनातील पदाधिकारी तसेच नगरसेवक उपस्थित होते.

# राज्यांतर्गत खरीप पीकस्पर्धेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती** :राज्यात अन्नधान्य, कडधान्य आणि गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत दरवर्षी राज्यांतर्गत पीकस्पर्धा आयोजित करण्यात येते. खरीप हंगाम २०२६-२७ साठी ही स्पर्धा जाहीर करण्यात आली असून, यावर्षी प्रथमच स्पर्धेसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. या स्पर्धेत विभागातील अधिकाधिक शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक डॉ. प्रशांत नाईक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

पीकस्पर्धेची संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्यासाठी कृषी विभागाने ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे. यामुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज करता येणार असून प्रशासनालाही स्पर्धेचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

या स्पर्धेत सर्वसाधारण तसेच आदिवासी गटातील शेतकरी सहभागी होऊ शकतात. तालुका स्तरावरील उत्पादकतेच्या आधारे जिल्हा व राज्यस्तरीय विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे. खरीप हंगामातील भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग आणि सूर्यफूल या एकूण ११ पिकांचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याच्या स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. एकाच शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. भात पिकासाठी किमान २० गुंठे, तर इतर पिकांसाठी किमान ४० गुंठे सलग लागवडीचे क्षेत्र असणे बंधनकारक आहे.

अर्जासाठी फार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र तसेच बँक खाते किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत आवश्यक आहे. मूग व उडीद पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ असून, भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमुग आणि सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ ही अंतिम तारीख आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटासाठी प्रति पीक प्रवेश शुल्क ३०० रुपये, तर आदिवासी गटासाठी १५० रुपये निश्चित करण्यात आले आहे.

तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये, जिल्हा स्तरावर १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये तसेच राज्य स्तरावर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या पीकस्पर्धेत सहभागी होण्यासाठी कृषी विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील "पीक स्पर्धा नोंदणी" (Crop Competition Registration) या टॅबवर जाऊन ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही विभागाने कळविले आहे.


# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ई-केवायसीची गती वाढवावी- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची पहिली यादी प्रसिद्ध झाली आहे. लवकरच उर्वरीत शेतकऱ्यांची यादी येणार आहे. त्यामुळे रविवारपर्यंत जिल्ह्यातील पहिल्या यादीतील 76 हजार 976 शेतकऱ्यांची ई-केवायसी गतीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज तालुकास्तरावरील सहायक निबंधक आणि बँकांचे प्रतिनिधी यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी . येरेकर यांनी कर्जमाफीची प्रक्रिया राबविताना बँकांनी सजगपणे काम करणे आवश्यक आहे. बँकेच्या शाखेमधून प्रत्येक कर्जदार शेतकऱ्यांना दूरध्वनी करून त्यांना कर्जमाफीची माहिती देण्यात यावी. त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात यावे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने २ लाख रूपयांची कर्जमाफी होणार आहे, याबाबत माहिती देण्यात यावी. कर्जमाफी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक हा महत्वाचा आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी नसल्यास तातडीने ही नोंदणी करण्यास शेतकऱ्यांना सांगावे. याकामी बँकांनी प्रयत्नपूर्वक कार्य करणे अपेक्षित आहे.



कर्जमाफीच्या अनुषंगाने येत्या शनिवार आणि रविवारी बँकांचे कामकाज सुरू ठेवण्यात यावे. याकामी स्वतंत्ररित्या दोन नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांच्याकडून कर्जमाफीबद्दल योग्य मार्गदर्शन करण्यात यावे. कर्जमाफीच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची सहमती घेताना त्यांना कर्जाच्या रकमेमध्ये फरक दिसत असला तरी उर्वरीत रक्कम बँक समायोजित करीत असल्याची माहिती देण्यात यावी. कर्जमाफीच्या प्रक्रियेत काही तक्रारी असल्यास त्या तात्काळ कळविण्यात याव्यात. त्यानुसार डाटामध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

जिल्ह्यात अद्यापही 76 हजार 976 ई-केवायसीपैकी 43 हजार 432 शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. आपले सरकार केंद्र येथे शेतकऱ्यांची ही केवायसी मोफत होणार आहे. केंद्र चालकांनी शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी केल्यास केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार आहे. तसेच कर्जमाफीसाठी ई-केवायसीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिल्या.

# लग्न समारंभानंतर नवरी घरीनेण्या अगोदर गोपूजन

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**दर्यापूर :** भारतीय सैन्य दलात पुणे येथे कार्यरत असणारे दर्यापूर तालुक्यातील बेलोरा गावातील जवान मंगेश बाबूरावजी भारसाकळे यांनी स्वतःचा विवाह सोहळा समारंभ संपन्न झाल्यानंतर घरी जातांना प्रथम गोरक्षण स्थळी सहपत्नी गोपूजन करून नवीन सुसंस्कृत रुढीचा शुभारंभ केला .विज्ञान व अध्यात्म या दोन्ही वातावरणात शालेय जीवनापासून ग्रामीण भागात व शेती व्यवसायात वास्तव्य असणाऱ्या मंगेश याने पत्नी समिक्षासह गोपूजन करून या पवित्र कार्याने तथा विवाह निमित्याने आपले वडील स्व . बाबुराव जानरावजी भारसाकळे यांचे स्मरण करून पितृआठवणीचे अश्रू गोचरणी अर्पण केले .या अभिनव कार्याबाबत माहुली ( धांडे) येथील या गाडगेबाबा



जवान मंगेश भारसाकळेंची सहपत्नी गोपूजा

गोरक्षण संस्थेचे संख्यापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी उभयतांना भरभरून आशिर्वाद दिले .विवाह प्रसंगी गोपूजन व तुळशी पूजन करून तथा घरातील मुख्य प्रवेश द्वारावर मातृचरण स्पर्श करून गृहप्रवेश करावा असे भावनिक आवाहन या प्रसंगा निमित्ताने प्रा भारसाकळे यांनी देशातील समस्त नवविवाहितांना केले आहे. सायंकाळी संपन्न झालेल्या या गोपूजन कार्यासाठी संस्था व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे, गोसेवक आशिष ठाकरे , श्रीकृष्ण पोटे, स्वराज इंगळे यांनी सहकार्य केले याप्रसंगी नवरी - नवरदेवा सोबत परिवारातील कु प्रगती विनोद भारसाकळे, कु . साई अविनाश भारसाकळे, भारतीय सैन्य जवान अमोल दादाराव भारसाकळे, सौ प्रणाली सचिन भारसाकळे, कु समृद्धी सांगोले, बाळासाहेब जानरावजी भारसाकळे, अवधूत दहिहांडेकर , विनोद श्रीरामजी भारसाकळे व गजानन पांडूरंगजी भारसाकळे ही सर्व जेष्ठ व श्रेष्ठ मंडळी उपस्थित होती .

# नवीन 125 रास्तभाव दुकानांसाठी अर्ज मागवले

## 1 ते 15 ऑगस्ट दरम्यान करता येणार अर्ज

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये 125 नवीन रास्तभाव दुकानांना मंजुरी देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुरवठा शाखेकडून जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार, पात्र संस्था व बचत गटांकडून या दुकानांसाठी अर्ज मागवण्यात आले आहे.

नवीन रास्तभाव दुकान मंजुरीसाठी शासनाच्या नियमांनुसार संस्था, गटांना प्राधान्य दिले जाणार आहे. ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयं साहाय्यता बचत गट, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था, संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या सार्वजनिक संस्था किंवा न्यास यांना परवाने देण्यात येणार आहे. मंजूर केलेल्या रास्तभाव दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदाय, गटाद्वारे करणे आवश्यक राहील. भातकुली - मक्रंदाबाद, मक्रमपूर, बोकुरखेडा, उदापूर, मलकापूर, नवथळ बू., कारखेडा, अडवी, कोलटेक, खालकोनी, देगूरखेडा, कृष्णापूर, तिवसा - जहांगीरपूर, आलवाडा, तळेगाव ठाकुर, चांदुर बाजार - अब्दलपूर, मौजखेडा, पिंपरी तळेगाव, वारोळी, खरवाडी, हिरापूर, अचलपूर - गोंडविहीर, कोठारा, जवर्डी, मेघनाथपूर, खतिजापूर, वाल्मीकपूर, सावळी खु., खानापूर, शहापूर, परतवाडा, अचलपूर, खैरी, सांगवी, दर्यापूर - चंद्रपूर, नांदुरा, ईटकी, सौदळी हिरापूर, सोनखेड, रुस्तमपूर, शहापूर, चांदुर जहानपूर, बनोसा, अंजनगाव सुर्जी - सर्फाबाद, औरंगपूर, कालवाडा, सैदापूर, कोठा, बोरगाव अंबाडा, वरुड - जामगाव, पिंपलागड, नागझरी, नांदगाव खंडेश्वर - निभोरा लाहे, जसापूर, भगुरा, बोरगाव, पिंपरी, खरबी गुंड, नांदगाव खं., नांदगाव ख., घारफळ, वढाळा, पळसमंडळ, पुसनेर, कोदरी, राजना, संग्रामपूर, चिखली वैदय, चिखलदरा - कुही, भुत्रुम, भिरोजा, केशरपूर, भांडुम, ढाकणा, खिरपाणी, पांढराखडक, डोमी, माडीझडप, आवागड, सलोना, टेटू, ढोमणीफाटा, लवाद वन, चिलाटी, रामटेक, कुलंगणा बु., चौऱ्यामल, शहापूर, मोझरी, बागलिंगा, लवादा, सुमिता, सलिता, खटकाली, मोर्शी - अंबाडा, हाशमपूर, धारणी - झिल्पी, खिडकी, कंजोली, दिया, रोरा, हरीसाल, चित्री, नांदुरी, अमरावती (ग्रामीण) - पुसदा, जामडोल, , कुऱ्हाड, मोगरा, हातला, पिंपळखुटा, चांदुर रेल्वे - सातेफळ, चांदुरखेडा, येरड, चांदुर रेल्वे, कोदरी हरब, धामणगाव रेल्वे - धामणगाव रेल्वे, रामगाव, वकनाथ, गिरोली या गावांमध्ये नवीन दुकानांसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत.

# राजापेठ पुलावर पुन्हा किरकोळ अपघात; पोलिसांची माहिती

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती:** राजापेठ येथील पुलावर कारचे नियंत्रण सुटल्याने पुन्हा किरकोळ अपघात झाला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली. चालक व जखमीचे नाव: निखिल अशोकराव बोरकर वय: ३२ वर्षे रा.राबिनगर, अमरावती असे आहे. ते डॉ. हर्षल शियाळेकर यांच्याकडे खाजगी चालक (Driver) म्हणून कार्यरत आहेत. ईर्टिगा गाडी क्रमांक: MH 12 M0662 असे कार आहे m १/०८/२०२६ रोजी रात्री १२:३० वाजता ईरटीगा गाडी घेऊन कवर नगर कडून राजापेठ कडे येत असताना राजापेठ उड्डाणपूल येथे आल्यावर गाडी उजव्या बाजूला टर्न घेताना ब्रेक दाबण्याऐवजी नकळत त्यांचा पाय ॲक्सिलेटरवर पडल्यामुळे गाडीचे संतुलन बिघडले. गाडी उड्डाणपुलाच्या कडेच्या भिंतीला जाऊन धडकली आहे.

गाडी क्र. MH 12 ML 0662 चे समोरील बाजूचे नुकसान झाले असून चालकाच्या डाव्या पायाला मुका मार (दुखापत) लागला असून इतर कोणत्याही वाहनाचा समावेश नाही. कोणाविरुद्धही कोणतीही तक्रार नाही.

वार्ड क्र. ३०, इर्विन दवाखाना, अमरावती येथे उपचार सुरू आहेत. गाडी राजापेठ पोस्टे ला आणून लावली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# विद्यापीठ, शासकीय अभियांत्रिकीचे कॅन्टीन विनापरवाना

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती:** अन्न व औषध प्रशासन कार्यालयाने शहरात कारवाई करीत आहे. अमरावती विद्यापीठ आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅन्टीनसह नामांकित हॉटेलवर एफडीएने कठोर कारवाई केली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे आणि आदिती देशमुख यांनी ३० जुलै रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅन्टीनची तपासणी केली. दोन्ही नामांकित संस्थांचे कॅन्टीन कोणत्याही अधिकृत परवान्याशिवाय सुरू असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एफडीएने दोन्ही कॅन्टीनचालकांना कॅन्टीन तत्काळ बंद ठेवण्याची नोटीस बजावली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत पोर्टलवरील रक्कम अंतिम राहणार

## सहकार आयुक्त दीपक तावरे यांचे स्पष्टीकरण

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अमरावती :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 अंतर्गत व्यापारी बँकांच्या एनपीए खात्यांबाबत गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या यादीतील थकबाकी आणि पोर्टलवरील रक्कमेत फरक दिसून येत आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य यांनी सर्व जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवून याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे.

राज्य शासनाने 2 जून 2026 च्या शासन निर्णयानुसार ही योजना जाहीर केली होती. या योजनेत कर्जमाफी, एकवेळ तडजोड योजना आणि प्रोत्साहनपर लाभ या तीन घटकांचा समावेश आहे. योजनेच्या पोर्टलवर बँकांनी 31 लाख 97 हजार कर्जखात्यांची माहिती सादर केली होती. त्यापैकी 25 जुलै 2026 रोजी 16 लाख 16 हजार कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची 7 लाख 3 हजार आणि व्यापारी बँकांची 9लाख 13 हजार खाते आहेत.

सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिलेल्या माहितीनुसार गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या यादीतील थकबाकी आणि पोर्टलवरील थकबाकी यामध्ये फरक असल्यास पोर्टलवरील रक्कमच ग्राह्य धरण्यात येईल. पोर्टलवरील थकबाकीची रक्कम 31 मार्च 2026 रोजीची आहे. शासनाने 1 जुलै 2026 रोजी सर्व बँकांना 1 एप्रिल 2026 नंतरचे व्याज न आकारण्याबाबत सूचना दिल्या आहेत. आधार प्रमाणीकरण यशस्वी झाल्यानंतर शेतकऱ्याला पावती देण्यात येईल. त्यात कर्जमुक्तीची रक्कम नमूद केलेली असेल. आधार प्रमाणीकरणानंतर 31 मार्च 2026 वरील कर्जबाकीची लाभाची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा केली जाईल. त्यानंतर बँकामार्फत कर्ज बेबाकीचे प्रमाणपत्र संबंधित शेतकऱ्याला दिले जाईल. कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकेच्या शाखेत आणि सेवा संस्थांमध्ये लावण्यात येतील. तसेच कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना संबंधित बँकेमार्फत खरीप हंगामासाठी पीककर्ज उपलब्ध करून दिले जाईल. पोर्टलवरील रक्कम किंवा इतर तपशीलाबाबत शेतकऱ्यांची काही तक्रार असल्यास त्यांनी पोर्टलवर ग्रिव्हन्स नोंदवावी. त्याचा निपटारा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत केला जाईल. सहकार आयुक्तांनी हे स्पष्टीकरण सर्व शेतकरी आणि आपले सरकार सेवा केंद्र चालक यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे निर्देश दिले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, योजनेची केली माती...

# चौकशी सुप्त, अहवाल गुप्त, भ्रष्टाचार लुप्त !

## पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले, चौकशी व तक्रारीतून धरले...




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अर्थात पोकरा भाग एक योजनेतील गैरप्रकार राज्यभर गाजला होता. परिणामी यातून मोठे घबाड बाहेर येणार अशी अपेक्षा जिल्हावासियांना लागली होती. मात्र चौकशी अहवाल गुप्त असल्याचे कारण देत या योजनेत झालेला भ्रष्टाचार चक्क लुप्त करण्यात आला असल्याची आश्चर्यकारक बाब समोर येत आहे. सबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्टनितीनेच सदर योजनेची माती केली असल्याचे आता उघड होत आहे.



रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार दाखल करत पोकरा भाग - १ योजनेत झालेल्या गैरप्रकाराचे बिंग फोडले होते. शेलुखडसे येथे या योजनेत झालेल्या गैरप्रकाराची पुराव्यासहित ३३ पानांची मुद्देसूद तक्रार करण्यात आली असल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. तालुक्यातील १८ गावांचा या योजनेत समावेश होता. त्यामुळे करोडो रुपयांचा गैरप्रकार उघड होणार अशी अपेक्षा शेतकऱ्यांना लागली होती. मात्र वरिष्ठ स्तरावरून योग्य ती दखल घेतल्या गेली नाही. विशेष चौकशी पथक ( एसआयटी ) मार्फत चौकशी न करता केवळ एका मर्जीतल्या तंत्र अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. सदर चौकशीत केवळ जिवंत फळबाग दिसून आली नाही. हा एक मुद्दा वगळता बाकीच्या मूळ मुद्यांना हेतुपुरस्पर डावलून थातुरमातुर चौकशी करण्यात आली असल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट होत आहे. चौकशी काय केली, कारवाई काय करण्यात आली हे सर्व नियमानुसार तक्रारदारास माहितिस्तव देण्यात यावे असा वरिष्ठ स्तरावरून आदेश असताना देखील जाणीवपूर्वक सर्व माहिती लपविण्यात आली असल्याचे तक्रारदार शेतकऱ्याचे म्हणणे आहे. या चौकशीत तक्रारदार शेतकऱ्याचे कुठलेही समाधान न करता भ्रष्टाचाराचे पाप झाकण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. योजनेचे सर्व निकष आणि नियम धाब्यावर बसवून शेलुखडसे गावात जो गैरप्रकार झाला तसाच प्रकार केवळ रिसोड तालुक्यात आणि जिल्हाभरात झाला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या पोकरा भाग - १ या योजनेची विशेष चौकशी पथक ( एसआयटी ) मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी तक्रारदार आणि अनेक शेतकरी संघटना करणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र राजकीय सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप आणि भ्रष्टअधिकाऱ्यांनी पाप झाकण्याचा प्रयत्न केला तर सदर प्रकरणी न्यायालयात दाद मागितली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

## थोडक्यात

### मंगरूळपीर येथे समाधान शिबिर
### नागरिकांना विविध प्रमाणपत्राचे वाटप



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

३१ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व समाधान शिबिरामध्ये अनेक गरजू लोकांना विविध प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

आ. शामभाऊ खोडे यांच्या अध्यक्षते.खाली मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त आयोजित या विधानसभा क्षेत्रस्तरीय शिबिरास प्रमुख उपस्थिती वाशिम चे नगराध्यक्ष अनिल केंदळे मंगरूळपीर चे नगराध्यक्ष अशोक परळीकर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, भाजापा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे वाशिम जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश उपविभागीय अधिकारी रवी काळे , तहसीलदार सुधाकर अनासूने निलेश पळसकर ,तहसीलदार वाशिम,निवासी तहसीलदार रवी राठोड निवडणूक अधिकारी निरंजन सातंगे , सुरेश भाऊ लुंगे , सुरेश मापारी , चक्रधर गोटे उपनगराध्यक्ष अनिल गावंडे , सुनिल मालपाणी भाजपा अध्यक्ष रवि पाटील ठाकरे , सुदर्शन धोटे अभिषेक दंडे , विनोद पाटील जाधव, पांडुरंग कोठाळे ,आर के राठोड नगर सेवक प्रा.वीरेंद्र ठाकूर प्रा. सुधीर घोडचर श्रीहरी इंगोले प्रा.नंदलाल पवार पांदण रस्ता समन्वयक वाशिम जिल्हा सुभाष नानोटे सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष तसेच पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष सह गटविकास अधिकारी वाशिम सोनवणे गटविकास अधिकारी मंगरूळपीर कारले मॅडम तालुका कृषी अधिकारी जावळे व इंगोले तसेच जिल्हा निबंधक सहकारी संस्था लातपाटे यांच्या सह विविध विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी व यंत्रणा प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी श्री रवी काळे तर संचालन प्रीती मेहकरकर व नायब तहसीलदार रवी राठोड साहेब यांनी केले.तसेच वाशिम व मंगरूळपीर तालुक्यातील सर्व तालुकास्तरीय यंत्रणा प्रमुखांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

# साहेब, वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा !

## *शासनाची जमीन शासनाच्या ताब्यात घ्या * संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा- सुभाष देव्हढे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●







येथील राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून मुलींच्या वसतीगृहाची मोठ्ठी ईमारत बेकायदेशीर बांधली. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेली वसतीगृहाची ईमारत चक्क वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मुलींच्या वसतीगृहासाठी नियमबाह्य भाड्याने देवून भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे.ही जागा शासनाच्या मालकीची असून राजस्थान कॉलेजच्या प्राचार्यासह संस्थाध्यक्षांनी कागदपत्रात हेराफेरी करून कोट्यवधीचा मलीदा लाटला आहे. त्यामुळे नियम व कायद्या वापरून शासनाची जमीन शासनाला परत करून शासनाचा फायदा करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळामार्फत सुरू असलेल्या राजस्थान महाविद्यालयाने जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर अनेक वर्षापासून अतिक्रमण केलेले आहे.या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून बेकायदेशीररित्या शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हा गैरप्रकार सर्वप्रथम सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांच्या निदर्शनास आली.देवढे पाटील यांनी या प्रकरणाची तक्रार येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.त्यानंतर त्यांनी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा सुद्धा केला.या प्रकरणाबाबत दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून 'या' अतिक्रमणाकडे शासनाचे लक्ष वेधले होते.तरीही वाशीमच्या महसूल प्रशासनाने 'या' अतिक्रमणाला 'राजाश्रय' देवून आजपर्यंत ते अतिक्रमण काढण्यासाठी आणि ती कोट्यवधीची जागा शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी पुढाकारच घेतला नसल्याचा आरोप सुभाष देवढे यांनी केला आहे.

राज्याचे विद्यमान कर्तव्यदक्ष महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास 'ही' गंभीरबाब आणून देवून महसूल प्रशासनाचा नाकर्तेपणाही उघडकीस आणून दिला आहे.देवढे पाटील यांचा या प्रकरणात शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.आता 'हे' अतिक्रमण महसूल प्रशासन काढण्यासाठी केव्हा मुहूर्त काढणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# हळदीचे पीक उपटून बंधाऱ्यावर फेकले !

## संतापजनक घटना





● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शेलगाव राजगुरे शिवारातील गट क्रमांक २८१ मध्ये प्रफुल्ल प्रकाशराव वाघ यांची शेती असून, ते व्यवसायाने शिक्षक असल्यामुळे शेतीची जबाबदारी त्यांचे वडील प्रकाशराव नारायणराव वाघ, प्रगतशील शेतकरी, सांभाळतात. काल मध्यरात्री अज्ञात इसमाने शेतात घुसून लागवड केलेली हळदीची रोपे उपटून शेताबाहेरील बंधाऱ्यावर फेकून दिली. सकाळी नेहमीप्रमाणे शेतात गेल्यानंतर हा प्रकार निदर्शनास आला.

या घटनेमुळे हळदीच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी कुटुंबाला आर्थिक फटका बसला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. संबंधित आरोपीचा शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळावा, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे.

# नियमाला हरताळ, कारवाईसाठी टाळाटाळ !

## लेमन सोड्यावर नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी






● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा प्रकरण आता 'शाही' थाटात गाजत आहे. कारण या उत्पादन कंपनीचा मालक कुणीतरी 'शहा' असल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी बाजारात विकल्या जात असलेल्या बाटलीवर उत्पादन तारीखच नाही, तर एक्सपायरी कधी ? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.तरीही नियमाला हरताळ फासणाऱ्या कंपनीवर कारवाईसाठी टाळाटाळ केल्या जात आहे.

शेलुबाजार येथील STRESSCURE सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा.ली. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमत नसल्याचे उघड झाले आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर ' SEE BOTTLER NECK/CAP असा उल्लेख आहे, मात्र त्या ठिकाणीही कोणतीही माहिती छापलेली नाही.' Best Before 3 Months from the date of mfg ' असं लिहिलं असलं तरी उत्पादन तारीखच नसल्याने एक्सपायरी कधी हे ग्राहकांना कळणार कसं ? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या बाबत सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सर्व सामान्य नागरिक करत असून कुठतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानिमित्ताने अन्न सुरक्षा नियमांनुसार उत्पादन तारीख, बॅच नंबर बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम का गप्प आहे. हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. मात्र माफीयांना कारवाईची धास्ती नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांची मस्ती उतरविण्याची गरज आहे.

# केनवडच्या अप्पर तहसीलसाठी लढा चौथ्या दिवशीही कायम

## तातडीने निर्णय घ्या , अन्यथा तीव्र आंदोलन -तेजराव पाटील वानखेडे

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●



केनवड येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय अन्यत्र न हलवता ते केनवडमध्येच सुरू करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणाला आज चौथा दिवस झाला आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष तेजराव पाटील वानखेडे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

साखळी उपोषणाला दिवसेंदिवस नागरिक, शेतकरी, व्यापारी, विविध सामाजिक संघटना तसेच परिसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. शासनाने अप्पर तहसील कार्यालयाबाबत त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी पुन्हा एकदा केली. मात्र अद्यापही प्रशासनाकडून कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नसल्याने उपोषण सुरूच ठेवण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, केनवड येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास परिसरातील हजारो नागरिकांची महसुली कामांसाठी होणारी गैरसोय दूर होईल. वारंवार रिसोड येथे जावे लागणार नसल्याने वेळ, पैसा आणि श्रमाची मोठी बचत होणार आहे. तसेच स्थानिक पातळीवरच महसुली सेवा उपलब्ध झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

यावेळी तेजराव पाटील वानखेडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'केनवडच्या अप्पर तहसील कार्यालयाबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा हे आंदोलन अधिक व्यापक व तीव्र करण्यात येईल. जनतेच्या न्याय्य हक्कासाठी सुरू असलेला हा लढा शेवटपर्यंत सुरू राहील.'







## जळगाव जामोद तालुक्यात 207 मि.मी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान....।

# लोकप्रतिनिधी प्रशासन आपल्या दारी; जळगाव जामोदमध्ये रात्रीच्या अंधारात नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर..

## नदीकाठच्या घरात पाणि,जिवनावश्यक वस्तू ही पाण्यात..।

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**जळगांव जामोद :** अतीवृष्टीच्या इशारा हा या परिसरासाठी सुचक इशारा ठरला त्यामुळे नागरिक सतर्क होते दि.30/31च्या रात्री 12ते 4 ह्या वेळात झालेल्या मुसळधार पावसामुळे दोन महिन्यांत काही नुकसान झाले नव्हते पण ह्या चार तासांत नदीकाठच्या भागात , खरडून जाणे ,बंधारे फुटणे ,पुराचे पाणी शेतातून वाहिल्याने पिके वाहून गेलीत तर काही भागातील पिके गाळामुळे दबलीत . सध्या तरी प्रशासन काही भागात बंधाऱ्यावर पोहचले आहे. शहरातील काही भागात पाणी नदीकाठच्या भागात तलाव पूरा ,वायलीवेस ,खेर्डा वेस ,वाडी खूर्द ,इतर भागात पाणी गेले होते , आमदार डॉ संजय कुटे, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे तहसिलदार पवन पाटील , ठाणेदार सचिन बागुल मुख्याधिकारी डॉ सुरज जाधव , इत्यादी अधिकाऱ्याचें संबंधित अन्य सहकारी , यांच्या सह शहरात पाणी असलेल्या भागात जाऊन नागरीकांना मदतीसाठी संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य महसुलत्या सुचना करत होते. या कठिण प्रसंगी.लोकप्रतिनिधी व प्रशासन समन्वय ठेवून तिनं वर्षांनंतर सोबत लोकाभिमुख दिसले . महसुल प्रशासनाची माहीती -- शहरातील एक व्यक्ती मृतक महादेव जगदेव वाघोदे वय 55वर्षे या.जळगांव जामोद. व न ऊ मृत शेळ्या पैकी 4 दुभत्या व 3 लहान 2 ओढणाऱ्या व काही घरांचे नुकसान झाल्याचे प्रार्थमिक अंदाज वर्तविण्यात आला . शेतीचे खूपच नुकसान झाले आहे .प्रशासन सर्व्हे करण्याच्या कामास लागले असल्याची माहिती दिली. सुनगांव शिवारात -- दोन तलाठी शेतीच्या बांधावर पोहचलेत व प्रत्येक्ष सर्व्हे दुपार प्रर्यन्त केले. तहसिलदार जामोद मध्ये --तहसिलदार पवन पाटील यांनी जामोद येथे जाऊन गावांतील काही भागाची पाहणी करून बेंबडेश्वर मंदीरात मागील भागात राहत शअसलेल्या आदीवासींना पाऊस वाढल्यास त्याची व्यवस्था मंगल कार्यालयात करण्याच्या सुचना तलाठी व इतर संबंधितांना केल्यात. शेतीचे व पिकांचे झालेल्या नुकसानीचा अंदाज सर्व्हे झाल्या नंतर होईलच पण नुकसान खूपच झाल्याची भिती महसुल प्रशासनाने व्यक्त केली.

संपूर्ण राज्यासह संग्रामपूर तालुक्यात मागील 36 तास पासून सतत मुसळधार पाऊस सुरू असल्याने तालुक्यातील नदी नाल्याना पूर आला आहे. या मुळे जन जीवन विस्कळीत झाले आहे. पावसाचा ऋतू सुरू झाला त्या वेळेस पासून या परिसरात पाहिजे तसा पाऊस नव्हता. शेतकरी वर्ग व मजूर वर्ग पाऊस पडावा या साठी रोज देवा कडे प्रार्थना करत होते. मागील 3 दिवस पूर्वी हवामान विभागाने काही जिल्हे रेड अलर्ट दाखवून सर्वांना आवाहन केले होते की मागील काही दिवस आपल्या परिसरात मुसळधार पाऊस पडणार आहे. हवामान विभागाने सांगितल्याप्रमाणे मागील 36 तासापासून या परिसरात सतत मुसळधार पाऊस सुरू आहे. दिनांक 30 जुलै च्या मध्यरात्रीपासून पावसाने जोर धरला असून नदी नाले यांना पूर आला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणीच पाणी साचले आहेत. तसेच जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्यामुळे त्यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले.

### कालखेड नाल्याला पूर

शेगाव तालुक्यातील कालखेड या नाल्याला पूर आल्यामुळे या परिसरातील देवाण-घेवाण मागील काही तासापासून बंद पडली होती. कालखेड नाला हा तीन तालुक्याला जोडणारा आहे. शेगाव येथून महामंडळाच्या बसेस बंद होत्या. शेगाव येथे जाणाऱ्या स्कूल बस या काठावर अडकलेल्या होत्या. या परिसरात अमर व इतर कंपनीचे दूध चार चाकी वाहनाने येते ते वाहने अडकलेले होते. पेपर वितरण करणारी गाडी अडकलेली होती. कालखेड नाल्यावरून पाणी असल्यामुळे शेगाव संग्रामपूर जळगाव येथील तालुक्याचा संपर्क तुटला होता.

### टाकली पंच गावाचा तालुक्याशी संपर्क तुटला

संग्रामपूर तालुक्यातील अखेरचे गाव टाकळी पंच या गावाजवळील मोरवा चा नाला आहे या नाल्याला आठ फूट पाणी होते. या गावाचा संग्रामपूर तालुक्याशी संपर्क तुटला होता. त्यांची दळणवळण व इतर सर्व कामे ठप्प पडल्याने सर्व जनजीवन विस्कळीत झाले होते.

तालुक्यातील काही ठिकाणी लाईन बंद संग्रामपूर तालुक्यात मागील 2 दिवस पासून सतत मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे.तालुक्यातील भोन, काथरगाव पिंपरी, रिंगणवाडी या गावातील वीज सेवा विस्कळित झाली आहे.है गाव रात्रभर अंधारात होते. दुसऱ्या दिवशी सकाळी महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनी यावर उपाययोजना सुरू केली.

### काही गावात पाणी घुसले

तालुक्यात सतत मुसळधार पाऊस पडला असल्याने तालुक्यातील नदी व नाल्यांना पूर आला. काही गावाजवळ नाले आहेत.या नाल्यांच्या दोन्हीही काठावरून पाणी वाहत होते.पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमानात असल्याने पाणी गावात घुसले.या मध्ये काथरगाव पिंपरी, वरवट बकाल येथे काही वार्ड मध्ये



मेंन रोड वर टोगल्या येवढे पाणी साचले होते.

### चोंडी धरण 100 टक्के भरले

मतदार संघातील शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई भासू नये म्हणून आमदार डॉक्टर संजय कुटे यांच्या प्रयत्नामुळे व दूरदृष्टीमुळे संग्रामपूर तालुक्यात चोडी हे धरण बांधण्यात आले. या पावसात ते शंभर टक्के भरले असून वरून पाणी ओसांडत आहे. शेकडो एकर शेती हे ओलिताची झाली पाहिजे या दृष्टीने या धरण्याचा कायपालट आमदार कुटे यांनी केला असून येत्या उन्हाळ्यात त्या परिसरातील शेतकरी याना शेती साठी व पिण्या साठी पाण्याची चिंता मिटली आहे. सतत पडत असलेल्या पावसाची नोंद सॅटेलाईट द्वारे प्रशासनाने घेतली असून या मध्ये दिनांक 31 जुलै च्या सकाळी दहा वाजेपर्यंत सोनाळा १०७ मिमी, संग्रामपुर १३९ मिमी, बावनबीर १३६ मिमी, पातुर्डी ७७ मिमी,कवठळ १२७ मिमी पडला आहे.

संग्रामपूर तालुक्यासह आजूबाजूच्या परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर परिस्थितीचा आढावा घेतला. सध्या पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला, तरी पुन्हा मुसळधार पाऊस होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे परिस्थितीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवून आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक तसेच प्रशासनातील सर्व संबंधित यंत्रणांशी माझा सतत संपर्क असून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. माझी सर्व नागरिकांना नम्र विनंती आहे की, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. नदी-नाले, पूल व पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून जाण्याचे टाळावे. आपल्या जनावरांची तसेच कुटुंबाची योग्य ती काळजी घ्यावी. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ माझ्याशी व प्रशासनाशी संपर्क साधावा. आमदार डा संजय कुटे

> माझी खेल माळी शिवारात 4 एकर शेती असून त्या मध्ये ऊस, वांगे, सोयाबीन हे पीक पेरले होते. सतत पावसामुळे या शेतात पाणीच पाणी असल्याने संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले आहे. या मुळे लाखो रू चे नुकसान झाले आहेत.
>
> **अजय रहाटे**
> शेतकरी पातुर्डा बु

**तालुक्यातील शेकडो एकर जमीन पाण्याखाली**

संग्रामपूर तालुक्यात मागील 36 तास पासून सतत मुसळधार पावसाने हजेरी लावली असता. तालुक्यातील शेकडो एकर जमीन पाण्या खाली गेली असून या जमिनीतील पिके खराब खराब होण्याच्या मार्गावर आहेत. शेतकरी यांनी उसनवारी पैसे घेऊन, कर्ज काढून, कृषी केंद्र वरून उधार घेऊन आपल्या शेतात कपाशी, तूर, सोयाबीन, ज्वारी,उडीद, मूंग, मक्का, भाजीपाला,फळ बाग,है पिके पेरली होती. मागील काही दिवस पासून पाणी नसल्याने शेतकरी यांनी ही पिके कशी बशी जगवली मात्र मागील काही तासात सतत मुसळधार पाऊस पडल्याने सर्वाचे होत्याचे नव्हते झाले.पाऊस पडत नसल्याने शेतकरी चिंतेत तर होता मात्र आता मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने व पिके पाण्याखाली गेल्याने आता अजूनही शेतकरी चिंतेत आहे. या कडे सरकार ले लक्ष देऊन भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे



# ढगफुटीसदृश पावसाने मलकापूर पुरते तुंबले; प्रशासकीय नाकर्तेपणामुळे नागरिक आणि व्यापारी उघड्यावर!

## नळगंगा नदीला पूर, वस्त्यांमध्ये ५ फूट पाणी; 'उबाठा'च्या रस्ता रोको आंदोलनानंतरही प्रशासन 'कुंभकर्णी' झोपेतच

**मलकापूर:** सलग काही तास झालेल्या ढगफुटीसदृश मुसळधार पावसाने मलकापूर शहराला पुरते झोडपून काढले आहे. नळगंगा नदीला आलेल्या भीषण पुरामुळे संपूर्ण शहराचे जनजीवन विस्कळीत झाले असून, स्थानिक प्रशासनाच्या घोर उदासीनतेचा व नाकर्तेपणाचा फटका पुन्हा एकदा सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांना बसला आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे व्यापाऱ्यांची धूळधाण पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने सखल भागातील दुकानांमध्ये ५ फुटांपर्यंत पाणी शिरले. यामुळे व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे साहित्य पाण्याखाली जाऊन प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. लोकप्रतिनिधींच्या घरासमोरील रस्त्यांवर पाण्याचे भले मोठे तलाव साचल्याने तासनतास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात रस्ता रोको; तरीही प्रशासन ढिम्म! मलकापूरमधील सखल भागात दरवर्षी पावसाचे पाणी साचून नागरिकांची दैना होते. पावसाळ्यापूर्वी योग्य नालेसफाई आणि पाण्याचा निचरा करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी तीव्र स्वरूपाचे 'रस्ता रोको' आंदोलन केले होते. मात्र, एवढ्या मोठ्या आंदोलनानंतरही स्थानिक,वाकोडी ग्राम पंचायत, मलकापुर ग्रामीण ग्राम प्रशासक,नगरपालिका आणि प्रशासनाने याची कोणतीही दखल घेतली नाही. 'कुंभकर्णी झोपेत' असलेल्या प्रशासनाने नागरिकांच्या जीवाशी व भावनेशी खेळत कोणतीही ठोस कारवाई केली नाही. प्रशासनाच्या याच बेफिकिरीमुळे आज संपूर्ण वाकोडी ग्रा.प अंतर्गत नगरे, मलकापुर ग्रामीण ग्राम पंचायत अंतर्गत नगरे,मलकापूर जलमय झाले असल्याचा घणाघाती आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक वस्त्यांत ५ फूट पाणी; सालीपुराचा संपर्क तुटला प्रशासकीय निष्काळजीपणामुळे आज तुलसी नगर, वृंदावन नगर भाग1,2,3,4, संताजी नगर, गोपाळ कृष्ण नगर,हरीकीरण सोसायटी, आनंद सोसायटी, हनुमान नगर,यशोधाम, मधुबन नगर, गणपती नगर आणि गोकुळधाम परिसरात तब्बल ५ फुटांपर्यंत पाणी साचून घरे पाण्याखाली गेली आहेत. वाकोडी परिसरातही पुराचे पाणी शिरल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहेत. सालीपुरा भाग संपर्कहीन: नळगंगा नदीच्या पुरामुळे सालीपुरा परिसराचा उर्वरित शहराशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटला आहे. आमदारांच्या घरासमोर पाण्याचे तलाव: आमदार चैनसुख संचेती यांच्या घरासमोरील मुख्य बुलढाणा रोडवर अजस्र पाणी साचल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला होता. पंचनामे करून तत्काळ भरपाई द्या; अन्यथा जनआक्रोश पेटणार! परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतर आता कुठे पोलीस प्रशासन वाहतूक सुरळीत करण्यासाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र आहे. मात्र, केवळ कागदी घोडे नाचवणाऱ्या आणि पोकळ आश्वासने देणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कडक कारवाई कधी होणार? असा संतप्त सवाल मलकापूरकर विचारत आहेत. पूरपरिस्थितीमुळे उद्ध्वस्त झालेल्या सर्व नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना त्वरित आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता लावून धरली जात आहे. वेळेवर उपाययोजना न करणाऱ्या निष्क्रिय प्रशासनाविरोधात जनतेचा संताप आता अनावर झाला असून येत्या काळात तीव्र जनआक्रोश भडकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अंडरपासमध्ये पाणी; नागरिकांचे रेल्वे रोको आंदोलन

## संतप्त नागरिकांचा रेल्वे प्रशासनाला इशारा

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**खामगाव :** शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे साईनगर परिसरातील रेल्वे अंडरपास पूर्णपणे पाण्याखाली गेला असून, नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अंडरपास मध्ये सुमारे १५ फूट पाणी साचल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे व साईनगर सह परिसरातील नागरिकांचा शहराशी संपर्क तुटला आहे. या समस्येच्या निषेधार्थ शुक्रवारी संतप्त नागरिकांनी खामगाव-जलंब रेल्वे मार्गावर उतरून रेल रोको आंदोलन केले व रेल्वे प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. या अंडर पास मध्ये प्रत्येक पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने नागरिक, विद्यार्थी, रुग्ण व कामानिमित्त ये-जा करणाऱ्यांना मोठ्या त्रासाला तोंड द्यावे लागते अनेक वर्षांपासून ही समस्या कायम असताना कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, असा आरोप आंदोलकांनी केला आहे. कायमस्वरूपी पर्यायी रस्ता उपलब्ध करून द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. रेल रोको आंदोलनाची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन, महसूल विभाग, स्थानिक प्रशासन व पोलिसांचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला मात्र, केवळ आश्वासनांवर विश्वास न ठेवता समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्याची ठाम भूमिका नागरिकांनी मांडली. आंदोलनामुळे काही काळ खामगाव-जलंब रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. प्रशासनाकडून अंडर पास मधील पाण्याचा तातडीने निचरा करण्याचे काम सुरू करण्यात आले असून, भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे; मात्र प्रत्यक्षात कायमस्वरूपी पर्यायी मार्गाची उभारणी झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नसल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले.

# वाघुड शिवारात अनधिकृत डिझेल साठ्यावर छापा

## साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**मलकापूर :** तालुक्यातील वाघुड गाव शिवारातील मुंबई–नागपूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एका ठिकाणी अनधिकृतपणे डिझेलचा साठा केल्याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी कारवाई करत सुमारे ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अत्यावश्यक वस्तू अधिनियमासह संबंधित पेट्रोलियम नियंत्रण आदेशांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यस्तरीय दक्षता पथक प्रमुख तथा नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या आदेशानुसार पुरवठा निरीक्षक धनवर्षा श्रीकृष्ण हरणे यांनी पंचांसमक्ष वाघुड शिवारातील श्री विश्वकर्मा वेल्डिंग वर्क्सजवळ छापा टाकला. या कारवाईदरम्यान दोन नोजल असलेले डिस्पेन्सिंग युनिट, ५० किलोलिटर क्षमतेच्या दोन भूमिगत लोखंडी टाक्या, १० किलोलिटर क्षमतेची एक भूमिगत टाकी तसेच सुमारे ४ हजार लिटर डिझेलसदृश द्रव पदार्थ असा एकूण अंदाजे ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

या प्रकरणी गणेश पुरुषोत्तम क्षीरसागर (वय ३८, रा. वाघुड, ता. मलकापूर) याच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच मोटार स्पिरीट व हायस्पीड डिझेल (पुरवठा, वितरण व गैरप्रकार प्रतिबंध) आदेश, १९९८ मधील संबंधित तरतुदींनुसार मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पंचांसमक्ष सुपूर्दनाम्यावर आरोपीच्या ताब्यात देण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश वेले करीत आहेत.

# जिल्ह्यात आभाळ फाटले; 91 मंडळांत पावसाचा कहर!

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव जिल्ह्यावर बुधवारी रात्रीपासून कोसळलेल्या पावसाने दोन दशकांतील विक्रम मोडीत काढला. अवघ्या २४ तासांत जिल्ह्यातील ९२ पैकी तब्बल ९१ महसूल मंडळांत ६५ मिमीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद झाली. २००६ नंतर प्रथमच जिल्ह्यात जवळपास सर्वच मंडळांत एकाच दिवशी अतिवृष्टी झाली आहे. जिल्ह्यात ३१ जुलै रोजी सरासरी १२५.९ मिमी पाऊस झाला. त्यामुळे ३० जुलैपर्यंत २५९.८ मिमी असलेली हंगामी सरासरी एका दिवसात ३८५.७ मिमीतर पोहोचली. जिल्ह्याने वार्षिक सरासरी पर्जन्यमानाच्या ५०.६४ टक्क्यांचा टप्पा गाठला आहे. गतवर्षी याच दिवसापर्यंत ३२७.३ मिमी म्हणजे ४२.९७ टक्के पाऊस झाला होता. यंदाची नोंद गतवर्षीपेक्षा ५८.४ मिमी आणि ७.६७टक्क्यांनी अधिक आहे. जळगाव जामोद तालुक्यात सर्वाधिक २०७.४ मिमी, तर नांदुरा तालुक्यात १७४.८ मिमी पाऊस झाला. खामगाव १५२.९, शेगाव १३९.७ आणि मलकापूरमध्ये १३१.२ मिमी पावसाची नोंद झाली. जळगाव जामोद तालुक्याने वार्षिक सरासरीच्या ७१.९३ टक्क्यांचा टप्पा गाठला आहे. शेगाव ५९.९३, नांदुरा ५७.९४, मोताळा ५२.९९, बुलढाणा ५२.३८, मेहकर ५१८४ आणि खामगाव ५०.३७ टक्क्यांवर पोहोचले. अशा प्रकारे सात तालुक्यांत वार्षिक सरासरीच्या निम्म्याहून अधिक पाऊस झाला आहे.

# अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नूतनीकृत शाखेचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन!







अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नूतनीकृत शाखेच्या उद्घाटन प्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करतांना माजी अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे, बँकेचे विद्यमान अध्यक्ष डॉ, जयराज कोरपे आणि उपस्थित मान्यवर

# डॉ. अभय पाटीलांच्या 'नंदनवन' भेटीने राजकीय चर्चांना उधाण

## औपचारिक भेट... पण संकेत काही औरच!

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अकोला :** अकोल्यातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. औपचारिक स्वरूपाची ही भेट असली तरी, तिच्यानंतर अकोला जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात नव्या समीकरणांच्या चर्चांना मोठी चालना मिळाली आहे.

काही दिवसांपूर्वी डॉ. अभय पाटील यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यावेळी त्यांनी वैद्यकीय सेवेला अधिक वेळ देण्याची भूमिका स्पष्ट केली होती. मात्र, त्यानंतर झालेल्या या भेटीमुळे त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत विविध स्तरांवर चर्चा रंगू लागली आहे.

### युवक आणि सामाजिक संघटनांचा मोठा पाठिंबा

डॉ. अभय पाटील यांच्यासोबत युवकांचा मोठा वर्ग, विविध सामाजिक संघटना आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे असल्याचे मानले जाते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक राजकीय हालचालीकडे जिल्ह्याचे विशेष लक्ष असते.



### ४.१६ लाखांहून अधिक मतांची ताकद

२०२४ च्या अकोला लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार म्हणून डॉ. अभय पाटील यांनी सुमारे ४ लाख १६ हजारांहून अधिक मते मिळवत अत्यंत चुरशीची लढत दिली होती. अल्प मताधिक्याने त्यांना पराभव स्वीकारावा लागला असला, तरी त्यांनी जिल्ह्याच्या राजकारणात स्वतःची प्रभावी ओळख निर्माण केली.

### 'चेहरा नवा... बदल हवा!' घोषणेची पुन्हा चर्चा

डॉ. अभय पाटील यांच्या राजकीय प्रवासाशी जोडली गेलेली "चेहरा नवा... बदल हवा!" ही घोषणा पुन्हा चर्चेत आली आहे. या भेटीनंतर सोशल मीडियासह राजकीय वर्तुळात या घोषणेचा उल्लेख होत असून, आगामी काळात त्यांच्या नव्या राजकीय भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत.

अकोला लोकसभा निवडणुक 2024 मध्ये इतिहासात पहिल्यांदाच काँग्रेसचे डॉ. अभय पाटील यांना 4,16,404 (35.67% मते घेवून दुसऱ्या क्रमांकावर राहिले. भाजपचे अनुप धोत्रे हे 4,57,430 (39.15%) मते घेवून विजयी झाले. तर वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे स्वतः निवडणूक लढवून 2,76,747 (23.71%) मते घेवून तिसऱ्या क्रमांकावर राहिले. भाजपचे अनुप धोत्रे यांच्याकडून काँगेसचे डॉ. अभय पाटील यांचा 40,626 (3.48%) मतांच्या फरकाने पराभव झाला. काँग्रेसचे डॉ. अभय पाटील यांना वंचितचे प्रकाश आंबेडकर यांच्या पेक्षा 1,39,657 जास्त मते मिळाली. 2019 लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे हिदायत पटेल यांना 2,54,370 (22.72%) मते होती तर भाजपचे संजय धोत्रे हे 5,54,444 (49.53%) मते घेवून जवळपास 3,00,074 (24.81%) एवढ्या मोठ्या फरकाने विजयी झाले होते. वंचितचे प्रकाश आंबेडकर यांना 2,78,848 (25.11%) मिळाली होती तर काँग्रेसचे हिदायत पटेल यांच्यापेक्षा 24,114 जास्त मते होती.

# राजंदा गावातील स्मशानभूमी कडील रस्ता दुरवस्थेत

## अंत्ययात्रेसाठी नागरिकांची मोठी गैरसोय

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**बार्शीटाकळी:** बार्शीटाकळी तालुक्यातील राजंदा गावातील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून, अंत्यसंस्कारासाठी मृतदेह स्मशानभूमीत नेण्याच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात चिखल, खड्डे . मोठ्या नद्यातून पाण्यामुळे हा रस्ता अधिकच धोकादायक बनत असून, अंत्ययात्रेदरम्यान मृतदेह खांद्यावर घेऊन जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थांनी



अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष या समस्येकडे वेधले आहे स्मशानभूमीसारख्या अत्यावश्यक ठिकाणी जाणारा रस्ता सुस्थितीत असणे ही मूलभूत गरज असून, प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल

# राजेश्वर मंदिर परिसरातील गटार दुरुस्तची मागणी

अकोला : जुन्या शहरातील श्री राज राजेश्वर मंदिर गेट समोरील गटार गेल्या तीन वर्षांपासून तुंबलेल्या अवस्थेत असून परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. गटाराचे सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने मंदिरात येणाऱ्या भाविकांसह स्थानिक रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे., गटारात साचलेल्या घाणीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अनेकवेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला

# धारणी पं.स.चा लाचखोर कर्मचारी 'एसीबी'च्या जाळ्यात

## विहिरीचे अनुदान मिळवून देण्यासाठी घेतली पाच हजारांची लाच

प्रतिनिधी १ ऑगस्ट

धारणी : विहिरीचे अनुदान मिळवून देण्यासाठी लाच घेणाऱ्या पंचायत समितीमधील कंत्राटी तत्वावरील तांत्रिक साहाय्यकाला रंगेहात अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) च्या पथकाने शुक्रवार, ३१ जुलै रोजी पंचायत समिती कार्यालयातच ही कारवाई केली.

बापू काशिनाथ बनसोडे (४६) असे लाचखोर कर्मचाऱ्याचे नाव आहे. तक्रारकर्त्या शेतकऱ्याच्या शेतात महात्मा गांधी रोजगार हमी योजना सिंचन विहीर मंजूर झाली असून, त्याला विहिर बांधकामासाठी ७० हजारांच्या अनदानाचा एक टप्पाही मिळाला आहे; मात्र उर्वरित १ लाख ३० हजार रूपयांचे अनुदान बाकी असल्याने तक्रारकर्त्याने बापू बनसोडे यांच्याकडे विनंती अर्ज दिला होता.

त्यावेळी बापू बनसोडे याने सदर अनुदान मिळवून देण्याच्या बदल्यात १० हजारांची मागणी केली. त्यामुळे त्या शेतकऱ्याने एसीबीकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार एसीबीने शुक्रवारी आधी पडताळणी सापळा रचला.

त्यामध्ये तडजोडीअंती बापू बनसोडे हा किमान पाच हजार रूपये घेण्यासाठी तयार झाला. त्यानंतर पुन्हा एसीबीने सापळा रचला असता, त्यामध्ये सदर रक्कम स्वीकारताना आरोपीला एसीबीने ताब्यात घेतले. याप्रकरणी धारणी पोलीस ठाण्यात त्याच्याविरूद्ध सायंकाळी उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

# उपनगराध्यक्षांची स्वच्छता मोहीम; नागरिकांकडून कौतुक

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अकोट :** शहरात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला. काही ठिकाणी नाल्यांमध्ये कचरा अडकल्यामुळे सांडपाणी रस्त्यांवर वाहू लागले होते. या परिस्थितीची माहिती मिळताच नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत स्वच्छता मोहिमेचे नेतृत्व केले.

सफाई कर्मचाऱ्यांसह विविध भागांची पाहणी करताना त्यांनी नाल्यांमधील अडथळे दूर करण्याच्या कामाला गती दिली. काही ठिकाणी पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी उपनगराध्यक्ष बोरोडे यांनी स्वतः हातात फावडा घेऊन गाळ व कचरा काढण्याचे काम केले. त्यांच्या या कृतीमुळे पाणी साचलेल्या भागांतील नागरिकांना दिलासा मिळाला. दरम्यान, नगरपरिषदेच्या पथकाने नाले व गटारींची साफसफाई करून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी विशेष मोहीम राबविली. भरपावसात प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणाऱ्या उपनगराध्यक्षांच्या कार्यपद्धतीचे नागरिकांनी स्वागत करत कौतुक केले. नागरिकांनी पावसाळ्यात अशाच प्रकारे नियमित स्वच्छता व नाल्यांची देखभाल करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# पावसाने धरणांमधील पाणीसाठा उंचावला

**अकोला:** अकोल्याला पाणी पुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात २५ टक्के जलसाठा झाला आहे. काटेपूर्णा धरणात एका दिवसाच्या पावसाने ३ दशलक्ष घनमीटर जलसाठा वाढला. त्यामुळे दिलासा मिळाला आहे. अशा प्रकारे जलसाठ्यात वाढ झाली तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटेल असा विश्वास व्यक्त होत आहे. या पावसामुळे वान प्रकल्प ६० टक्क्यांच्या पार; २४ तासांत साठ्यात तब्बल ७.३० दशलक्ष घनमीटरने वाढ झाली.

विशेष म्हणजे एकाच दिवसात अकोल्यातील ६ प्रमुख प्रकल्पांची पातळी वाढली. तेल्हारा परिसरात दमदार पाऊस झाला. वान धरणाचा साठा थेट ५३% वरून ६१.९३ टक्क्यांवर पोहोचला. निर्गुणा प्रकल्पात पाऊस नसतानाही पाण्याची आवक; साठा ४२ टक्क्यांवर.

अकोला पाटबंधारे विभागाने १ ऑगस्ट रोजी दिलेल्या अहवालानुसार प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणी गोळा झाले. मोर्णा आणि दगडपारवा धरणांतही वाढ; ५० टक्क्यांच्या समीप साठा. कोरड्या उमा प्रकल्पालाही संजीवनी मिळाली असून जलसाठा २.५१ % वरून ४.१७ टक्क्यांवर पोहोचला आहे.

वाढत्या जलसाठ्यामुळे अकोल्यात सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे.

# ई 20 पेट्रोल चा धसका.. जुन्या वाहन विक्रीचा घसरला टक्का

## जुन्या वाहनांपेक्षा नवीन वाहन खरेदीकडे ग्राहकांचा कल

प्रतिनिधी १ ऑगस्ट

**अकोला:** प्रत्येकाला आपले स्वतःचे वाहन असावे असे वाटते परंतु सध्या वाहनांच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत त्यामुळे अनेक जण चांगल्या कंडीशन मधील जुने वाहन घेण्याचा विचार करतात. अकोला शहरात अनेक ठिकाणी जुनी वाहन विक्रीची दुकाने आहेत. आतापर्यंत तेजीत असलेला हा व्यवसाय सध्या मंदीने ग्रासला आहे.

कारण ई 20 पेट्रोल विरोधात अचानक निर्माण झालेल्या वातावरणामुळे म्हना किंवा वाहन खराब होण्याच्या अफवेने तसेच इ 20 पेट्रोल बाबत वेगवेगळ्या प्रकारची माहिती समोर येत असल्याने ग्राहक संभ्रमात आहेत त्यामुळे सध्या ते जुनी वाहने खरेदी करण्याचे टाळत असून याचा परिणाम जुने वाहन विक्री करणाऱ्या व्यवसायिकांवर झाला आहे. ई 20 पेट्रोल मुळे वाहनांमध्ये उद्भवत असलेल्या तांत्रिक अडचणी आणि सोशल मीडियावर या संदर्भात व्यक्त होत असलेल्या नाराजीचा परिणाम आता जुन्या वाहनाच्या बाजारावर स्पष्टपणे दिसू लागला आहे ई 20 पेट्रोलची सुसंगत नसलेली जुनी दुचाकी आणि चार चाकी वाहने खरेदी करण्यास ग्राहक कचरू लागल्याने जुन्या वाहनांच्या पुनर्विक्री बाजारात मंदीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या जुन्या वाहनांच्या बाजाराची रौनक ओसरत चालली आहे केवळ जुन्या वाहनांनाच अडचणी येत आहेत असे नाही नव्या वाहनांबाबतही काही तक्रारी येत आहेत इथेनॉल मध्ये पाण्याचे मिश्रण झाल्यास कोणत्याही वाहनात बिघाड होऊ शकतो.




### नवे इलेक्ट्रिक व्हेईकल खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल

ई 20 पेट्रोल बाबत वेगवेगळ्या प्रकारची माहिती समोर येत असल्याने ग्राहक संभ्रमात आहेत त्यामुळे सध्या ते जुनी वाहने खरेदी करण्याचे टाळत असून शोरूम मधील नव्या वाहनांकडे त्यांचा कल वाढला आहे विशेषता इलेक्ट्रिक बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांची खरेदी वाढली आहे जुने वाहन खरेदी करून डोकेदुखी वाढवून घेण्यापेक्षा अनेक ग्राहक काही रक्कम डाऊन पेमेंट करून नवे वाहन खरेदी करण्याला प्राधान्य देत आहेत

### जुने वाहन विक्रेत्यांना दिलासा मिळण्याची आशा

ई- ट्वेंटी पेट्रोल विरोधात अचानक निर्माण झालेल्या वातावरणामुळे जुन्या वाहनांच्या खरेदीत घट झाली आहे परंतु भविष्यात परिस्थिती पूर्ववत होईल अशी त्यांना अपेक्षा आहे जुन्या वाहनांना ई -20 अनुकूल बनवण्यासाठी विशेष किट उपलब्ध होणार असल्याची चर्चा असून त्यामुळे काहीसा दिलासा मिळेल अशी ही या जुन्या वाहन विक्रेत्यांना आशा आहे




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135